# शिंग फुंकिले रणी

वसंत बापट



भ. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २७६९

REFBK-0023916

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

4 SEP 199

13 MAY 1987

2 O... 1988

( कृ. मा. प. )
५०००–१२–८२

संदर्भ काव्य
२७८६
२३९१६
११।८।८३

हिंग झंकिलेरणीं

# शिंग फुंकिले रणीं

वसंत बापट

REFBK-0023916

REFBK-0023916

प्रकाशक :
लीलाधर हेगडे
साने गुरुजी आरोग्य मंदिर
सांताक्रूझ ( पश्चिम )
मुंबई ४०० ०५४

© वसंत बापट
प्रथमावृत्ती : १७ ऑक्टोबर १९८२
मुखपृष्ठ, रेखाचित्रे, रचना :
वासंती मुझुमदार
मूल्य : १५ रुपये

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०।३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ छपाई :
नलिनी प्रिंटर्स
१६–१८ नोबल चेंबर्स
एस० ए० ब्रेलवी मार्ग
मुंबई ४०० ००१

या गीतांच्या संगतीने

आयुष्यभर

वाटचाल करणाऱ्या

लीलाधरला

भारताच्या राजधानीत सायंकाळच्या सावल्या पुढे सरकत असताना यमुनेच्या तीरावर बसून निवांतपणे नदीच्या पाण्यावर नजर टाकली की भारताच्या साऱ्या गत इतिहासाचे, देशाच्या स्वातंत्र्य–संग्रामांचे, वैभवशाली विजयांचे आणि दारुण पराजयांचे प्रतिबिंब यमुनेतून डोकावते आणि क्षणभर भास होतो की पाण्यावर तरंगत आहे ती भारताचीच गाथा. “ शिंग फुंकिले रणीं ” हा वसंत बापट ह्यांचा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात लिहिलेल्या देशभक्तिपर गीतांचा संग्रह चाळतानाही बरोबर अशीच भावना मनात डोकावते.

इतिहासकार स्वातंत्र्याचा इतिहास लेखणीने लिहितात, देशभक्त आपल्या रक्ताचे अर्घ्य देऊन तो घडवतात; परंतु हा इतिहास घडवणाऱ्यांच्या ओठांवर मात्र स्फुरतात वसंत बापटांच्यासारख्या कवींची, गीतकारांची भान हरपवून टाकणारी समरगीते. अशाच गीतांच्या सुरांवर आणि तालांवर कोणी देशभक्त फाशीच्या तक्तावर हसतमुखाने चढले तर कोणी बंदुकीच्या गोळीला सामोरे गेले. त्यांच्या अतुल पराक्रमाचा आणि दिव्य बलिदानाचा जयजयकार लाखो मुखांतून उमटला तोही पुन्हा बापटांसारख्यांच्या गीतांद्वारेच.

वसंत बापटांची प्रतिभा अनेक रंग घेऊन फुलली. त्यांच्या काव्यातून आणि गीतांतून विविध रस ओसंडले आणि त्यांत रसिक वर्ग अक्षरशः न्हाऊन निघाला. ज्यांनी करुणेत भिजलेली वसंत बापटांची “ झेलमचे अश्रू ” ही भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली काळजाला भिडणारी कविता वाचली असेल किंवा ऐकली असेल त्यांना हा त्यांचा गीतसंग्रह वाचताना मनात शंका येईल की,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७६४
दा. क्र. 2-3-29-6
दिनांक 99/6/63
ग्रंथ शाखा (स्थल प्रत)

गीत गात चालले

दास्यकाल संपला    शांत काय झोपला
अग्नि येथ कोपला    पेटुनी नमा भिडे

ह्या गीताचे लेखक वसंत बापट आणि "झेलमचे अश्रू" टिपणारे बापट एकच का ? परंतु क्षणात आपल्या कवितेतून आणि गीतातून कारुण्याचे दर्शन घडवून श्रोत्यांच्या पापण्या ओलावणारे आणि दुसऱ्याच क्षणी राखेखाली दबलेले देशभक्तीचे निखारे आपल्या गीतांतून फुलविणारे कवी वसंत बापट ह्यांच्या जीवनाला साने गुरुजींच्या जीवनाचा स्पर्श झाला होता हे ध्यानात ठेवले की वसंत बापटांच्या गीतांमागील प्रेरणांचे रहस्य उमगते.

इवलासा अश्रु, ओलावा तो किती, अमित पिकती, माझे मळे

ह्या शब्दांतून अश्रूंचे सामर्थ्य उभे करणारे साने गुरुजी अन्यायाबद्दलच्या पोट-तिडिकीने गरजले,

उठू दे देश, पेटू दे देश, येथुन तेथुन सारा पेटू दे देश

साने गुरुजींच्या जीवनातील आणि साहित्यातील करुणा आणि वीरता ह्या दुहेरी प्रेरणा म्हणजेच वसंत बापटांच्या गीतांमागील स्फूर्तीचे जिवंत झरे. बापटांच्या ह्या संग्रहातील गीतांची तार स्वातंत्र्य-संग्रामाच्या तारेशी समांतर जुळलेली आहे. यामुळेच एक तार छेडताच तिचे झंकार दुसरीतही उमटतात.

लोकमान्य टिळकांचा स्वराज्य-मंत्र, गांधी युगातील वीस, तीस आणि बेचाळीस सालचे स्वातंत्र्य लढे, नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या "जय हिंद" आणि "चलो दिल्ली" ह्या आझाद हिंद फौजेच्या घोषणा आणि गोमंतकाचा मुक्तिसंग्राम ह्या सर्वांचे पडसाद वसंत बापटांच्या गीतांमध्ये समर्थपणे उमटलेले आहेत आणि म्हणूनच बापटांचा हा गीतसंग्रह म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामाचा संगीत आलेखच आहे असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

स्वातंत्र्याचे स्वप्न खंडित अवस्थेत का होईना १९४७ मध्ये साकार झाल्यानंतरचे सोनेरी क्षणही वसंत बापटांनी आपल्या गीतांमध्ये कलात्मकतेने गुंफलेले आहेत. १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीपूर्वी काही क्षणच पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारताच्या घटना समितीमध्ये ऐतिहासिक भाषण करताना भावनापूर्ण उद्गार काढले :

> "आज मध्यरात्री सारे जग निद्रित असताना स्वतंत्र भारताला जाग येईल....एका युगाचा अस्त होईल....दीर्घ काळपर्यंत दबल्या गेलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला वाचा फुटेल...."

मध्यरात्री १२ चे ठोके पडले. स्वतंत्र भारत जन्माला आला. दबलेल्या आत्म्याला वाचा फुटली, तशीच वसंत बापटांच्या प्रतिभेलाही. गुलामगिरीच्या काळोख्या रात्री-नंतर स्वातंत्र्याची पहाट फटफटली आणि त्यांच्या काव्यमय लेखणीतून गीत उसळले :

शतकानंतर आज पाहिली पहिली रम्य पहाट
मेघ वितळले, गगन निवळले
क्षितिजावर नव रंग उसळले
प्रतिबिंबित ते होउन खुलले भारतभूमिललाट

मराठी भाषेचा अंगभूत सौंदर्य तर आहेच; परंतु कधी संस्कृत भाषेची सुंदर वस्त्रे परिधान करून मराठी भाषा डुलू लागते तेव्हा तिचा डौल, तिचा रंग आणि तिचे रूप यांवर सौंदर्याचा एक नवा साज चढतो. याचे दर्शन घडते वसंत बापट यांचे " जय भारत वर्ष महान ! " हे गीत ऐकताना.

हा रजतशिखरधर गिरिवर सुंदर उत्तरेस हिमवान्
हे नीलगगनगत चक्र सुदर्शन तळपत वरि भास्वान्
हे चंद्रचलितजल ऊर्मिल सागर मन्द्र गाति जयगान
जय हिंद, हिंद आनंदभुवन जय भारतवर्ष महान्

हे कवी वसंत बापटांच्या गीतातील सुरम्य शब्द कानावर पडतात तेव्हा कवीच्या वर्णनशैलीने सौंदर्याचे अत्युच्च हिमशिखर गाठल्याचाच साक्षात्कार होतो.

वसंत बापटांची लोकनृत्याची गीते ऐकताना वाटते की त्यांची गीतेच पायांत पैंजण घालून मोठ्या डौलात नाचत आहेत; तर कारुण्यात भिजलेले त्यांचे गीत कानावर पडले की भास होतो, त्यांचे गीत म्हणजे वेदनेचाच वेद. हिमालयाच्या उत्तुंग शिखराचे सौंदर्य आपल्या गीतांतून बापट टिपू लागले की क्षणभर वाटू लागते की हिमालयाचे धवल शिखर गाठलेले आणि सौंदर्याचा ध्यास घेतलेले बापट हे एक धाडसी गिर्यारोहकच; तर "आली कोकणगाडी" हे गीत बापट झपाटल्यासारखे गाऊ लागले म्हणजे डोक्यात कल्पना येते की बापटांचे हे गीत म्हणजे अतिद्रुत वेगाने धावणारी रेलगाडीच. विविध रसांमध्ये भिजून चिंब झालेली वसंत बापट यांची गीते टिपण्याचा योग येणे हा एक आनंदमय अनुभव आहे आणि हा अनुभव ज्यांना लाभला ते मोठे भाग्यवानच म्हटले पाहिजेत.

बापटांची कविता वाचताना गांधीजींच्या विचारांची झलक काही ठिकाणी त्यांच्या कवितेत स्पष्टपणे आढळते. गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांना धाडलेल्या सुप्रसिद्ध पत्रात गांधीजींनी लिहिले—

> " माझे घर मला सर्व बाजूंनी बंदिस्त होऊ द्यायचे नाही, त्याचप्रमाणे माझ्या खिडक्यांची कवाडेही बंद ठेवायची नाहीत. सर्व देशांतील संस्कृतींचे वारे माझ्या घरावर मुक्तपणे मला वाहू द्यायचे आहेत; पण त्यामुळे माझ्या भूमीत रोवून ठेवलेले माझे पाय मात्र मी उद्ध्वस्त होऊ देणार नाही. "

बरोबर ह्याच विचारांचे प्रतिबिंब किती हुबेहुबपणे "केवळ माझा सह्यकडा" ह्या बापटांच्या कवितेत पडलेले आहे! ह्या कवितेमध्ये बापट म्हणतात—

विशाल दारे माझ्या घरची खुशाल ही राहोत खुली
मज गरिबाची कांबळवाकळ सकलांसाठी अंथरली
मात्र भाबड्या हृदयात
तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुनि झंझावात
कोटि कोटि छात्यांचा येथे कोट उभारू निमिषात

गांधी-युगामध्ये साहित्यिकांच्या मनावर गांधीजींचा ठसा किती खोलवर उमटला होता याचेच हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

हिमालयाच्या भव्यतेचे पोवाडे गाणारे वसंत बापट आपले पाय मात्र सह्याद्रीच्या काळ्या फत्तरावर भक्कमपणे रोवून उभे राहिले :

भव्य हिमालय तुमचा अमुचा केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजिन रायगडा

सह्याद्रीचा हा जयजयकार करतानाही बापट विसरले नाहीत की आमची महाराष्ट्रावरील निष्ठा हा राष्ट्रावरील व्यापक निष्ठेचाच एक अभंग आणि अविभाज्य अंश असला पाहिजे आणि राष्ट्राच्या संकटकाली हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्री धावून गेला पाहिजे. हीच भावना उराशी बाळगून १९६२ च्या चिनी आक्रमणाच्या काळात "उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू" ह्या आपल्या विलक्षण लोकप्रिय गीताने वसंत बापट ह्यांनी देशभक्तांच्या अंतःकरणात खोलवर रुजलेल्या राष्ट्ररक्षणाच्या उदात्त भावनेला वाचा फोडली. जनमनातला हा निर्धार पंडित नेहरू आणि लोकसभेपर्यंत पोचवण्यासाठी नाथ पै यांनी हे गीत लोकसभेतील भाषणात गौरवाने उद्धृत केले होते. चीनची व पाकिस्तानची आक्रमक नजर भारताकडे फिरली तेव्हा "या गनिमाला" भारतीय जनतेच्या वतीने आव्हान देताना कवीने लिहिले :

या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान
दिसला त्याला तपीं बैसला दुरून गिरि हिमवान
गंगेच्या अंगावर दिसला झुलता हिरवा साज
यमुनातीरीं संगमरवरी चंद्रमण्यांचा ताज
पंचनद्यांची अक्षय थाळी बहार झेलमवरचे
गगन-मांडवा खांब रोविले माड दक्षिणेघरचे
परी न दिसले त्याला इथले जिते लोह-पाषाण

१९६५ आणि १९७२ च्या युद्धात भारताने पाकिस्तानविरुद्ध दैदीप्यमान विजय मिळविले आणि बापटांच्या गीतातून व्यक्त झालेला देशाच्या रक्षणाचा पोलादी निर्धार सार्थ ठरला.

राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली जोपासल्या गेलेल्या भारतीय राष्ट्रवादाचे वैशिष्ट्य हे की ह्या राष्ट्रवादाने भारताची राष्ट्रीय अस्मिता जागृत केली, पण तिला राष्ट्रीय अहंकाराचा दर्प मात्र येऊ दिला नाही. भारतीय राष्ट्रवादाचा प्रवाह विशाल मानवतावादाशीच एकरूप व्हावा हे स्वप्न गांधीजींनी उराशी बाळगले होते. हे स्वप्न आपल्या गीतात गुंफताना बापट म्हणाले :

मानव तितुका एकच आहे
नीच न कोणी उच्च न कोणी
हाच आपुला धर्म खरोखर
हीच आपुली शाश्वत वाणी

भारतामध्ये स्वातंत्र्याची रजत-जयंती साजरी झाली. ह्या रजत-जयंतीचे निनादही वसंत बापटांच्या गीतातून उमटले. परंतु केवळ इंग्रज ह्या देशातून गेले, स्वातंत्र्याची रजत-जयंती धुमधडाक्याने साजरी झाली एवढ्यानेच स्वातंत्र्य-सैनिकांचे समाधान झाले नाही. राजकारणाच्या पटावरील सत्तेची प्यादी नुसती हलवून समाजपरिवर्तन घडून येत नाही. नवनिर्मितीसाठी रचनात्मक कार्याची प्रचंड शक्ती उभी करणे अगत्याचे आहे, हे हेरून वसंत बापट गरजले :

तुझ्या पोलादी टाचेखालून, जित्या पाण्याचे निघतिल झरे
तुझ्या लोखंडी दंडामधून, वाहे विजेची ताकद कि रे

नवनिर्मितीचा हा वेदमंत्र गात अनेक तरुणांची कुदळ फावडी श्रमशिबिरांत चालली आणि त्यांच्या कामांतून आणि घामातून रचनात्मक कार्याच्या ऊर्मी जोपासल्या गेल्या.

स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी सारा देश झुंजत असतानाच आपल्या अनिर्बंध सत्तेला ग्रहण लागेल ह्या भीतीपोटी सत्ताधाऱ्यांनी १९७५ साली देशावर " आणीबाणी " लादली. लोकनायक जयप्रकाशांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई सुरू झाली. " निर्भय बनो " हा लोकनायकांचा संदेश सर्वत्र दुमदुमला. स्वातंत्र्यासाठी लढणारे अनेक सैनिक गजांआड गेले. बाहेर राहिले त्यांतीलही निर्भय स्वातंत्र्यवाद्यांनी आपली वाणी आणि लेखणी ही हत्यारे स्वातंत्र्य-रक्षणासाठी परजली. आणीबाणीच्या काळोख्या रात्री वसंत बापटांनी आपल्या गीतातून सावधानतेचा इशारा दिला :

अजून आपली रात्र ना संपली पहाट राहिली दूर
असू दे आपला आवाज तापला टिपेचा लागू दे सूर
सावध व्हा भाई सावध व्हा

अठरा महिन्याच्या आणीबाणीनंतर अनेक तुरुंगांचे दरवाजे उघडले. स्थानबद्ध बाहेर पडले. निवडणुकांचे चौघडे वाजले. सावध झालेल्या जनतेने मतपेटीचा चमत्कार केला. जुनी राजवट कोसळली. नवी दिटी, नवे राज्य आले. अंतःस्थ कलहाचा शाप नव्या राजवटीला भोवला. ही राजवटदेखील कोसळली. नव्या निवडणुका आल्या. आणीबाणीतील राज्यकर्ते परत सत्तेवर आले. स्वातंत्र्यावरील आक्रमण पुन्हा चोर पावलांनी सुरू झाले. " सावध व्हा भाई सावध व्हा " ह्या वसंत बापटांच्या आणीबाणीतील गीताला पुन्हा नवा संदर्भ प्राप्त झाला, नवा सूर लाभला.

अनेक देशभक्तांच्या भगीरथ प्रयत्नांनी भारत १९४७ मध्येच परकीय सत्तेपासून मुक्त झाला. पण स्वातंत्र्याची ही गंगा सामान्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी त्यांच्या झोपडीपर्यंत अद्यापि पोहोचलीच नाही. ह्यामुळेच आजही भारताची निम्मी लोकसंख्या गरिबी रेषेखालील असह्य जीवन जगत आहे. त्यांच्या जीवनाचा रंग पालटून टाकण्याचे सामर्थ्य केवळ समाज-परिवर्तनातच आहे. गांधी–जयप्रकाश ह्यांना अभिप्रेत असलेली ही संपूर्ण क्रांती नव्या प्रेरणा आणि नव्या जाणिवा देऊन समर्पण भावनेने झुंजणाऱ्या समाज क्रांतिकारकांकडूनच होईल. अशा प्रकारच्या क्रांतीबद्दलही वसंत बापट निराश नाहीत. आपल्या " बिजली " ह्या गीतात त्यांनी पूर्वीच हा विश्वास व्यक्त केला आहे :

बिजली येईल अवचित । न्याय करील जगतात
या औतातुन, हातोड्यातुन । या जात्यातुन, या पात्यातुन
या भात्यातुन, या दात्यातुन । या कामातुन, या घामातुन,
या अश्रूंतुन, या अग्नीतुन
ठिणगी फुटेल जोसात । येईल विजेच्या वेषात

परिवर्तनाकडे चातकाप्रमाणे डोळे लावून बसलेले सारे समाजक्रांतिकारक ह्या गीतातील " बिजली " ची आतुरतेने वाट पहात आहेत. ही बिजली कडाडेल तो दिव्य क्षण असेल वसंत बापटांच्या ह्या अमोल गीतसंग्रहाच्या फलश्रुतीचाच मंगल क्षण.

१०, अशोक रोड,
नवी दिल्ली
२ ऑक्टोबर १९८२

मधु दंडवते

साने गुरुजी आरोग्य मंदिरातर्फे हे पहिले पुस्तक प्रकाशित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. या संग्रहामधील बरीचशी गीते आधीच इतर पुस्तकांत प्रसिद्ध झालेली असली तरी ती विखुरलेल्या स्वरूपात. वसंत बापट यांचा एवढा मोठा गीतसंभार या पुस्तकात प्रथमच एकत्रपणे पहावयास मिळणार आहे. समुदायाने म्हणण्यासाठीच यातील बहुतेक गाणी संकल्पिलेली असल्यामुळे, आपल्या समाजाची एक महत्त्वाची गरज या गीतसंग्रहाच्या प्रकाशनाने काही प्रमाणात तरी भागेल, हा आम्हा सहकाऱ्यांच्या दृष्टीने मोठा लाभ आहे.

'कोणत्याही देशातील तरुणांच्या ओठी कोणती गाणी खेळतात ते मला सांगा, म्हणजे त्या देशाचे भवितव्य मी वर्तवीन,' हे साने गुरुजींनी वारंवार उद्धृत केलेले वाक्य आहे. ह्यात उपस्थित केलेल्या सवालाला आपण काय जबाब देऊ शकू ? मुले फिल्मी गाणी काय ती जाणतात, अशी नुसती कुरकुर तरी काय कामाची ? काय वाटेल ते होवो, त्यांचे गाणेच बंद करावे, हा दुराग्रह ठरेल. पण मग मुलांच्या ओठांवर राहावीत अशी गाणी त्यांच्यापर्यंत पोचायला पाहिजेत. त्या दृष्टीने हा आमचा प्रयत्न लहान असला तरी योग्य दिशेने केलेला आहे एवढीच पावती आम्हाला समाजाकडून मिळाली तरी पुरे.

साने गुरुजी आरोग्य मंदिराचा मी मानद कार्यवाह आहे, त्यामुळे हा सुंदर संग्रह संस्थेतर्फे प्रकाशित व्हावा याचा मला अभिमान वाटावा हे स्वाभाविक आहे. मात्र माझा या गीतांशी एवढाच संबंध आहे, असे नाही. गेली चाळीस वर्षे

# निवेदन

ही गाणी गातच मी लहानाचा मोठा झालो. १९४४ पासून मी वसंत बापटांची गाणी कुमारांना, तरुणांना शिकवत आलो. त्यांची सुघड, सोप्या चालीची पण नादमधुर रचना मोठी लाघवी आहे; एकदा तिची चटक लागली की इतर गाणी फिक्की वाटू लागतात. सुलभ गीतरचना हा या कवीचा मोठाच विशेष आहे. या गीतांमागे उत्कट प्रेरणा आहेत आणि सानेगुरुजींनी केलेल्या संस्कारांचे, विचारांचे बळ आहे. राष्ट्रीय आणि सामाजिक आंदोलने आणि नव्या समाजाची स्वप्ने यांनी वसंत बापटांचे संवेदनाक्षम मन स्पंदन पावते आणि मग ही अशी गाणी जन्माला येतात. त्यांचेच शब्द वापरून म्हणावेसे वाटते की अशा प्रकारच्या गीतांच्या क्षेत्रात त्यांनी 'नवा इतिहास' घडवला आहे. स्वातंत्र्य आणि लोकशाहीचा ज्यांना जय-जयकार करायचा असेल किंवा अन्याय आणि दडपशाहीचा ज्यांना धिक्कार करायचा असेल त्यांनी वसंत बापटांच्या या रचना उंच ढाल्या सुराने गाव्या हे आता आपल्या अंगवळणी पडले आहे. महाराष्ट्राबाहेरही त्यांच्या गीतांचे शब्द आणि सूर पोचले आहेत याचा मी अनेकवार अनुभव घेतला आहे.

आमच्या या कवीला नुकतीच साठ वर्षे पूर्ण झाली. ज्याने समाजाला एवढा मोठा गीतनिधी दिला त्याच्या गौरवासाठी आम्ही लवकरच एक समुचित योजना साकार करणार आहोत. 'वसंत बापट गीत-गौरव करंडका'साठी एक आंतर शालेय समूह गीतगायन स्पर्धा आम्ही योजिली आहे. या स्पर्धेच्या स्वरूपाचा विचार करीत असताना या पुस्तकाची कल्पना सुचली. हे पुस्तक प्रकाशित करण्याची आमची मनीषा आज पुरी होत आहे.

साधना प्रेसचे श्री० नाना डेगवे आणि त्यांचे सहकारी यांच्या परिश्रमामुळे पुस्तकाची छपाई सुबक झाली. आपले काम त्यांनी तडफेने अल्प मुदतीत पुरे केले. श्रीमती वासंती मुजुमदार यांनी अतिशय आपुलकीने सारा साज सरंजाम करून दिला. नलिनी प्रिंटर्सचे श्री० ए० सी० शहा यांनी मुखपृष्ठाची विकट छपाई फार कौशल्याने करून दिली. आमचे ज्येष्ठ मित्र प्रा० मधु दंडवते यांनी त्यांच्या कार्य-बाहुल्यातून सवड काढली आणि संग्रहाला प्रस्तावना लिहून दिली. त्यांच्यासारख्या थोर स्वातंत्र्यसैनिकाने गेली काही दशके आपण वसंत बापटांचे 'गीत गात चाललो' असे म्हणावे, यात सारे आले. आणखीही आप्तसुहृदांचे सहकार्य लाभले, नेहमीसारखेच. त्यांच्या सहकार्याशिवाय हीच काय पण कोणतीही माझी योजना कशी साकार होणार ? सर्वांचे आभार.

मुंबई, १७ ऑक्टोबर १९८२

लीलाधर हेगडे


स्वातंत्र्याचा निर्धार / १–१०
स्वातंत्र्याचा जयजयकार / ११–१८
भारतगौरव / १९–२६
महाराष्ट्रगौरव / २७–३६
नव्या प्रेरणा / ३७–५४
संग्रामाची गाणी / ५५–७४
जनजागरण / ७५–८२
सेवा दल / ८३–९६
लोकनृत्याची गाणी / ९७–११०
संकीर्ण / १११–१२८

क्रम

१९४२ ते १९८२, चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात लिहिलेल्या गीतांचा हा संग्रह आहे. विशीच्या उंबरठ्यावर मी उभा होतो तेव्हाची आरोळी होती, शिंग फुंकिले रणीं. साठीच्या संध्या-छाया अंगणात आल्या तेव्हा मनांत गुणगुणलो, 'देह मंदिर चित्त मंदिर एक तेथे प्रार्थना, सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना'. ही माझी गाणी. ही तुमचीही व्हावीत अशी असोशी जन्मभर वाहिली. 'स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढला साक्षी कवी जाहला', एवढ्याच समाधानाचा आता मी भुकेला आहे.

वसंत बापट

# स्वातंत्र्याचा निर्धार



१ शिंग फुंकिले रणीं

२ बोला घुमवा हा पडसाद

३ भारत झाला जागा

४ ऊठ लढाया

५ जय सुभाष

६ शिकवण

७ लाभू दे

८ भारता तव मुक्तीसाठी

रोज सकाळी रविकिरणांसह
रुक्ष कहाण्या ~~[illegible]~~ घुसती नेत्री
27 आणि भयाच्या कुरख्या घेऊन
फिरतो आम्ही दोघा रात्री.

शिंपुणाले रानी २४५६ काम

समरगीते काव्य

वसंत बापट

एक झाड दोन पक्षी

विश्राम बेडेकर

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

स्थापना - १ जून १८९३

सस्नेह निमंत्रण

# १२३ वा वर्धापन दिन

प्रमुख पाहुणे

## मा. श्री. संजय देशमुख

(कुलगुरु मुंबई विद्यापीठ)

याच कार्यक्रमाचे वेळी कै. ॲड. वा. अ. रेगे

वाङ्मयीन पुरस्कार २०१५

वितरण समारंभ

ललित विभाग (विभागून)

१) श्री. भगवान निळे - "सांगायलाच हवय, अस नाही..."

२) जगन्नाथ टिळक - "मिशन मंगळ... सत्य की खेळ?"

ललितेतर विभाग

१) श्री. गिरीश कुबेर - "टाटायन : एक पोलादी उद्यमगाथा

---

या वर्षीचा संस्थेचा उत्कृष्ट सेवक पुरस्कार २०१५

सौ. वरदायिनी योगेश दिवेकर

---

बुधवार दि. १ जून २०१६ रोजी

सायंकाळी ६.०० वाजता

स्थळ मराठी ग्रंथ संग्रहालय

कै. ग. ल. जोशी सभागृह, ३ रा मजला,

नौपाडा केंद्र, गोखले रोड, ठाणे (प).

आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

★ आपले नम्र ★

श्री. मा. य. गोखले — अध्यक्ष

श्री. विद्याधर वालावलकर — कार्याध्यक्ष

★ कार्यवाह ★

श्री. विद्याधर ठाणेकर

श्री. पद्माकर शिरवाडकर

श्री. सतीशचंद्र कोर्डे

श्री. चांगदेव काळे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३७६
दा. क्र. २३८९६
ता. ११/८/८३
ग्रंथ शाखा (स्थळ क्र.)

## १ : शिंग फुंकिले रणीं

शिंग फुंकिले रणीं वाजतात चौघडे
सज्ज व्हा, उठा उठा सैन्य चालले पुढे

दास्यकाल संपला शांत काय झोपला
अग्नि येथ कोपला पेटुनी नभा भिडे

लोकमान्य केसरी गर्जतात वैखरी
माजला असे अरी चारु त्याजला खडे

वीस सालचा लढा जाहला किती बडा
इंग्रजास बेरडा आणिले कसे रडे

तीस सालची प्रभा उज्ज्वला भरी नभा
गांधि अग्रणी उभा ठाकला रणीं पुढे

शीर घेउनी करीं दंग होउ संगरीं
घालवू चला अरी सागरापलीकडे

बोला घुमवा हा पडसाद । इन्किलाब झिंदाबाद

रक्त आपुले देउनि सारे
कशास जगवा ही सरकारे
करा घोषणा, द्या रे साद । इन्किलाब झिंदाबाद

सुवर्णभूमी भारतमाता
कसे वदावे ऐसे आता
किसान अन्नाला मोताद । इन्किलाब झिंदाबाद

बांधव सारे हिंदु अहिंदू
जरि ते हिंदी तयांस वंदू
करू परी परका बरबाद । इन्किलाब झिंदाबाद

आजवरी हा जुलुम सोसला
परका अपुल्या घरी पोसला
देऊ आज तयाला याद । इन्किलाब झिंदाबाद

अर्ज विनंत्या फर्डे खर्डे
गाऱ्हाणी अन् रडे ओरडे
यांनी का कधि लागे दाद । इन्किलाब झिंदाबाद

मोहपाश जरि मार्गी येती
तोडा सारे सोडा भ्रांती
अंगीं येऊ द्या उन्माद । इन्किलाब झिंदाबाद

तोडा फोडा बेड्या साऱ्या
भिणे न आता वादळवाऱ्या
युद्धदुंदुभी काढी नाद । इन्किलाब झिंदाबाद

## ३ : भारत झाला जागा

भारत झाला जागा, जगता, भारत झाला जागा
अन्यायाला परदास्याला नाही आता जागा

शेतकरी हे कामकरी हे
निःस्वार्थी अन् विद्यार्थी हे
एक जाहले सारे वा हे
शिंपडुनी नवरुधिर फुलवतिल स्वातंत्र्याच्या बागा

अज्ञानाची संपे रजनी
जन कलहाच्या नाहित भजनी
सत्ता परकी उरे कोठुनी ?
संघटनेचा मंत्र लाभता जागृति अंगोपांगां

आजवरी तव लोहपंजरीं
कोंडुनि ठेवसि भारतकेसरि
सर्व बंधने तोच विदारी
विमुक्त झाला भारतकेसरि सन्मानुनि त्या वागा

आजवरी तव भाराखाली
गंगा राहियली पाताळीं
तीच आजला वरती आली
अचूक बाणें आणी भारत स्वातंत्र्याची गंगा

## ४ : ऊठ लढाया

उठ ऊठ लढाया नवतरुणा
जन ते तरती रे जे लढती
नच दाविति कोणि तयां करुणा
जे स्फुंदति याचति ओरडती

बघ दाहि दिशांतुनि शत्रु बळी
तुज वेढति जिंकिति वैभव रे
अन् आळस आणि दुहीदुफळी
घरभेदि चमू त्यां साह्य करे

चल घेइ तुझी समशेर करीं
पुरुषार्थ असे तव शस्त्र खरे
दृढ निश्चय निर्भय वृत्ति धरी
निमिषात तुझे मग दैन्य सरे

भज देव म्हणोनी देश तुझा
त्या देइ तनू अन् चित्त तुझे
चल तैल म्हणोनी दे रुधिरा
बघ देवापुढला दीप विझे

जरि त्याग असीम करून अता
तू मातिमधे चिणुनी घेशी
त्या मातिमधूनिच येइल रे
नवजीवनवल्लरि सुंदरशी

## ५ : जय सुभाष

जय सुभाष, जय सुभाष, मंत्र हाच आजला
घोष हाच गाजला
भारतात दश दिशांत नाद हा निनादला
जय हिंद। चलो दिल्ली

होउनी फकीर ध्येयमंदिरात रंगला
ना जुमानिलेत तुंग पर्वतां नि जंगलां
धन्य सैन्य ते
आशेवर जगणारे। वाऱ्यावर तगणारे
शांत ना कधी। श्रांत ना कधी
भारतीं। आरती। म्हणुनि गाउ या चला
मंत्र हाच आजला०

मस्तकांवरी समस्त खड्ग नग्न टांगले
भीतिशून्य सैन्य तुझे तरिहि नाहि पांगले
धन्य सैन्य ते
रात्र असो दिवस असो। अन्न नसो वस्त्र नसो
शांत ना कधी। श्रांत ना कधी
भारतीं। आरती। म्हणुनि गाउ या चला
मंत्र हाच आजला०

भारतात ठायिं ठायिं व्यक्ति व्यक्ति पेटली
बेचाळिस क्रांतिलागि दिव्य शक्ति भेटली
धन्य नृपति तू
देश नसो वेष नसो। दंड नसो कोष नसो
शांत ना कधी। श्रांत ना कधी
रक्त द्या। मुक्त व्हा। हेच ठाउके तुला
मंत्र हाच आजला०

# ६ : शिकवण

याऽऽ

स्वातंत्र्याच्या निर्मल उदयीं निर्भय हृदयीं या रे या
वीर बनोनी सारे या
होण्या विजयी या रे या
स्वातंत्र्याच्या निर्मल उदयीं निर्भय हृदयीं या रे या

गाऽऽ

स्वातंत्र्याची मंजुळवाणी प्रेरक गाणी गा रे गा
या क्रीडांगणिं गा रे गा
हसऱ्या वदनीं सारे गा
स्वातंत्र्याची मंजुळवाणी प्रेरक गाणी गा रे गा

भ्याऽऽ

जातियतेला कलिदुहितेला कलह-कलाला भ्या रे भ्या
अंध स्वार्था सारे भ्या
खोट्या अभिमानाते भ्या
जातियतेला कलिदुहितेला कलह-कलाला भ्या रे भ्या

न्याऽऽ

स्वातंत्र्याच्या बंधुत्वाच्या संदेशा जगिं न्या रे न्या
संघटनेच्या संदेशा
समानतेच्या संदेशा
स्वातंत्र्याच्या बंधुत्वाच्या संदेशा जगिं न्या रे न्या

जाऽऽ

स्वातंत्र्याचा झेंडा बरवा मिरवा फिरवा जा रे जा
दाहि दिशांतुनि सारे जा
अभिमानाने जा रे जा
स्वातंत्र्याचा झेंडा बरवा मिरवा फिरवा जा रे जा

## ७ : लाभू दे

लाभू दे ऽ परतुनी   हरवले   हरपले   जे श्रेय ते
ठेवू दे ऽ युगभरी   भुलुनिया   विसरलो   जे ध्येय ते
नेते ऽ जे भले   लाभले
त्यांच्या ऽ सत्कृती   संप्रती
चित्तीं ऽ आठवू   साठवू
आणू या ऽ क्षणभरी   कणभरी   तनुमधे   सामर्थ्य ते

माता ही ऽ नच सुखी   अवमुखी   परगृहीं   दासी जशी
पुत्रांना ऽ तिळभरी   मनिं तरी   शरम ना   वाटे कशी
या या ऽ त्यजुनिया   या भया
या या ऽ स्मरुनिया   नव वया
ध्याया ऽ हरुनिया   रणिं जया
यत्नाने ऽ फिरुनिया   मिळवु या   जननिचे   स्वातंत्र्य ते

## ८ : भारता तव मुक्तीसाठी


भा ऽ रता तव मुक्तीसाठी वेचू सारे पंचप्राण

कुणी अम्हाला वंदो निंदो कुणी करो अपमानाते
हसोत कोणी उपहासाने अमुच्या संगरगानाते
म्हणोत नाही लढा लढाया आम्हा दुबळ्यांमाजी त्राण

तुंबळ संगर-सागरलाटा उठतिल जों आवेगाने
परसत्तेचे तटबंधारे कोसळतिल त्या वेगाने
खुल्या हवेतच खुलेल मंगल स्वातंत्र्याचे दिव्य निशाण

गुलामगिरिचा गिरि उल्लंघुन स्वातंत्र्याचा सूर्य बघू
गुलामगिरिच्या तिमिरामधुनी मुक्तिज्योतीसाठि निघू
गुलामगिरिच्या मरणामधुनी स्वातंत्र्यामृत करु निर्माण

# स्वातंत्र्याचा जयजयकार



९ शतकानंतर

१० स्वातंत्र्याचा जयजयकार

११ रजत जयंती स्वातंत्र्याची

१२ आज तुझ्यासाठी भारता

१३ नवी प्रभात

१४ वल्हवा रे नाव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७८६
ग्रं. क्र. २३०९६
शाखा (स्थूल ग्रंथ)

## ९ : शतकानंतर

शतकानंतर आज पाहिली पहिली रम्य पहाट

मेघ वितळले, गगन निवळले
क्षितिजावर नव रंग उसळले
प्रतिबिंबित ते होउनि खुलले भारतभूमिललाट

आजवरीच्या अंधारात
अनंत झाले उल्कापात
एकवटोनी तेज तयांचे तिमिर सरे घनदाट

फकिरांनी शत यज्ञ मांडले
वेदीवरती रक्त सांडले
त्या रक्ताची क्षितिजावर ये आरुण मंगल लाट

दीप पेटवुनि घरदारांचे
पूजन केले स्वातंत्र्याचे
त्या ज्योतींचे तेज मिसळुनी झाले आज विराट

पुरेत अश्रू दुबळे क्रंदन
भावपूर्ण करु विनम्र वंदन
नव-अरुणाचे होऊ आम्ही प्रतिभाशाली भाट

## १० : स्वातंत्र्याचा जयजयकार

त्रिवार त्रिवार त्रिवार
स्वातंत्र्याचा जयजयकार
ऐका अमुचा हा ललकार
स्वातंत्र्याचे रक्षण करण्या प्राणपणें लढणार

स्वातंत्र्याचे वारे आता संचरले अंगात
जुन्यापुराण्या रूढी आता विसरा ह्या देशात
हाच मनात विचार, हाच मनात विचार
कुणी कुणाहुन मोठा नाही
कुणी कुणाहुन छोटा नाही
समान सारे भाई भाई
हा अमुचा निर्धार

जाती-पाती ह्यांच्या भिंती आता कोसळणार
हिंदी तितुका एकच आहे हेच खरे ठरणार
संघटना करणार, एकजूट करणार
कसणाराला धरणी देऊ
श्रमणाराला गिरणी देऊ
फिरून मिळवू सारे भाऊ
वैभव अपरंपार

## ११ : रजत जयंती स्वातंत्र्याची

वाजे विजय-तुतारी रे
तोरण बांधा दारीं रे
रजत जयंती स्वातंत्र्याची दुमदुमते ललकारी रे
चला रे घुमवा जयजयकार
जय जय भारतमाता

खडतर होती पहिली वाट
आता सरले अवघड घाट
या विजयाच्या शिखरावरती झेंडा उंच उभारी रे
रजत जयंती स्वातंत्र्याची दुमदुमते ललकारी रे। चला रे०

भूमीमध्ये जिरला घाम
कामकऱ्यांचे फळले काम
हिरवी राने हिरवी पाने हिरवी भूमी सारी रे
रजत जयंती स्वातंत्र्याची दुमदुमते ललकारी रे। चला रे०

हिंमत हरली दैन्याची
फत्ते झाली सैन्याची
भारतमाता आहे आता भाग्याची अधिकारी रे
रजत जयंती स्वातंत्र्याची दुमदुमते ललकारी रे। चला रे०

नवतरुणांनो सरसावा
जपा जपा रे हा ठेवा
नव्या नव्या नित आकाशांतुन मारा गरुडभरारी रे
रजत जयंती स्वातंत्र्याची दुमदुमते ललकारी रे। चला रे०

## १२ : आज तुझ्यासाठी भारता

गोड गोड गीत घुमे युवतींच्या ओठीं
आज तुझ्यासाठी भारता
धुंद फुंद शीळ घुमे युवकांच्या ओठीं, आज तुझ्यासाठी भारता

लाभला स्वराज्यतिलक भरतभूमिभाला
शतकाचा एक चरण आज पुरा झाला
आनंदा पूर येत पापणिच्या काठीं, आज तुझ्यासाठी भारता

प्राणांचे दान दिले याद येत त्यांची
धन्य धन्य बंदिवास भोगला तयांची
आमच्या मनामनात भावगंध दाटी, आज तुझ्यासाठी भारता

या स्वतंत्र भारतास रूप दिले ज्यांनी
खूप धन्यवाद त्यांस देउ आसवांनी
जन्म जन्म राहतात या अतूट गाठी, आज तुझ्यासाठी भारता

आव्हाने तर असंख्य वर्तमान देतो
साद घालतो भविष्य नाद ऐकु येतो
ध्येयाचे लेख नवे रेखले ललाटी, आज तुझ्यासाठी भारता

झुलत डुलत आनंदें गात नव्या रागा
फुलत फुलत नौजवान फुलवतील बागा
कर्तुकिचे हे सलाम ताठ साठ कोटी, आज तुझ्यासाठी भारता

## १३ : नवी प्रभात

उधळित शतकिरणां उजळित जनहृदयां
नभात आला रे प्रभातरवि उदया
तिमिराची रजनी गेली रे लया

थरकति चंचल जळलहरी
नटली सजली वसुंधरा
मधुमय मंगल स्वरलहरी
चढल्या भिडल्या दिगंतरा
धिं धिं धिं ता धिं धिं धिं ता दुंदुभीच्या नादासंगे
अंबराच्या मंदिरात मंद्र वाजे सनई
जय जय बोला जय जय बोला कोटिकोटि कंठांतूनी
भारताच्या भविष्याच्या पहाटेच्या समयीं
रे संपली ती शर्वरी
ये हा रवी या अंबरीं
तिमिराची रजनी गेली रे लया

चल करि वंदन नवयुवका
गगनीं विलसे नवा रवी
तुजसि न बंधन कधि पथिका
दिसली तुजला दिशा नवी
दिडदिडदारा दिडदिडदारा प्राण आता झंकारती
तारुण्याच्या सामर्थ्याला कारुण्याची साथ दे
या भूमीला आकाशाचे आशीर्वाद आज हवे
पौरुषाला विक्रमाचे वैभवाचे हात दे
ही प्रार्थना ही कामना
ही भावना ही अर्चना
तिमिराची रजनी गेली रे लया

## १४ : वल्हवा रं नाव

वल्हवा रं वल्हवा रं वल्हवा रं नाव – वल्हवली
वल्हवा रं नाव – वल्हवली । वल्हवा रं नाव – वल्हवली


नौका चाले कशी जलावरी – जलावरी, जलावरी
आहे सारा भार मुलांवरी – मुलांवरी, मुलांवरी
लहान वीर – महान धीर
रोखील वादळ वल्हवा रं – वल्हवली

मोकाट पिसाट वारा आला – येउ द्या रं, येउ द्या रं
डोंगरमापाच्या लाटा आल्या – येउ द्या रं, येउ द्या रं
छाती अफाट – झेलेल लाट
रोखील वादळ वल्हवा रं – वल्हवली

झेंडा माथ्यावर तीनरंगी – तीनरंगी, तीनरंगी
संचारवी जोम नव अंगीं – नव अंगीं, नव अंगीं
डोले कसा – बोले कसा
धैर्यानं नाव तुम्ही वल्हवा रं – वल्हवली

स्वातंत्र्य दौलत मोलाची रं – मोलाची रं, मोलाची रं
सर्वांच्या जीवाच्या तोलाची रं – तोलाची रं, तोलाची रं
ती एक आस – तो एक ध्यास
जोसात नाव आता वल्हवा रं – वल्हवली

# भारतगौरव



१५ जय भारतवर्ष महान्

१६ प्यारा हिंदुस्तान

१७ श्रुतिसुंदर वाद्यवृंद

१८ भारत-गौरव-गान

१९ दीप लागले

## १५ : जय भारतवर्ष महान्

जय हिंद, हिंद आनंदभुवन, जय भारतवर्ष महान्

हा रजतशिखरधर गिरिवर सुंदर उत्तरेस हिमवान्
हे नीलगगनगत चक्र सुदर्शन तळपत वरि भास्वान्
हे चंद्रचलितजल ऊर्मिल सागर मन्द्र गाति जयगान
जय हिंद, हिंद आनंदभुवन, जय भारतवर्ष महान्

हा वंग रंगला कलापूजनीं गुर्जर मृदु उद्गार
रजपूत, शीख, रणधीर मराठा वीर धरी तलवार
काश्मीर रम्य सीमांत दक्षिण प्रांत स्वर्गसोपान
जय हिंद, हिंद आनंदभुवन, जय भारतवर्ष महान्

न्हा मुदित उदित हा उदयगिरीवर रवि उजळित अस्मान
हा अधरिं मधुर नवगीत आळवित पूर्वेचा पवमान
खग हर्षभरित जग पुण्य करित नित उधळतात मधुगान
जय हिंद, हिंद आनंदभुवन, जय भारतवर्ष महान्

जे हीन पतित जे दीन दलित त्यां आश्वासन विश्वास
हा हरित हरित भूखंड साठविल अखंड मनिं विश्वास
मग मरणकिरण जरि अणुतुन आले देउ तयां आव्हान
जय हिंद, हिंद आनंदभुवन, जय भारतवर्ष महान्

हे एक ईश, दो सूर्य चंद्र, हे तीन लोक साधार
या चार वेद, तुम्हि पंचभूतगण, सहा ऋतू साकार
या सप्त सिंधुंनो, अष्ट दिशांनो, गा नव मानवगान
जय हिंद, हिंद आनंदभुवन, जय भारतवर्ष महान्

## १६ : प्यारा हिंदुस्तान

प्यारा हिंदुस्तान माझा प्यारा हिंदुस्तान
नव्या जगाच्या नव्या घडीचे एकच आशास्थान

इथे हिमालय, कीर्ति हिमासम
इथे नद्यांसह प्रीतिरसागम
भव्य सागर नि जन पुरुषोत्तम
दिव्य प्रेममय त्यागी जनता येथिल सृष्टिसमान

रक्तपिपासू न ही संस्कृती
वृकव्याघ्रांसम नसे प्रकृती
मानव्याची मूर्त आकृती
सकल जगाला मानवतेचे देई पाठ महान्

येथे अकबर, येथ शिवाजी
कबीर, तुलसी, एकनाथजी
बुद्ध, प्रबुद्ध नि शुद्ध गांधिजी
एकी, शांती, त्याग नि प्रीती यांची माणिकखाण

आज भारतीं जे जे लढती
जे जे पिचती, झिजती, रडती
पिळले जाती, छळले जाती
बलशाली परि करिल भारता हे त्यांचे बलिदान

परकीयांच्या पाशामधुनी
विमुक्त झाली अपुली जननी
मुक्त करिल ही अवघी अवनी
दलित नि शोषित सारे गातिल स्वातंत्र्याचे गान

## १७ : श्रुतिसुंदर वाद्यवृंद

श्रुतिसुंदर वाद्यवृंद भारतात वाजे
विविधरंग विविध-अंग 'भारती' विराजे

अंग वंग अन् कलिंग
भावमधुर अंतरंग
शततरंग हृदयरंग कवि रवींद्र साजे

कबिर सूर तुलसिदास
अमित गुंफिती पदांस
मीरेला एक ध्यास, गिरिधर पति माझे

भूमि पंचनदपुनीत
गाई मदमस्त गीत
सूफींची मधुर प्रीत नित बहार ताजे

आंध्र-तमिळ-केरलीय
द्राविड कर्नाटकीय
भक्तांचे भजन गेय श्रवुन अमृत लाजे

गुर्जर, गोमंतकात
स्वर मंजुळ गुंजतात
गीत महाराष्ट्राचे दश दिशांत गाजे

या सहस्रवीणेवर
नितनवीन फुलति सूर
भावगंध काव्यबंध रचिति ज्ञानराजे

## १८ : भारत-गौरव-गान

जगिं घुमवा रे, दुमदुमवा रे भारत-गौरव-गान
या रक्ताला या मातीचा मृत्युंजय अभिमान
उदात्त उज्ज्वल सुंदर मंगल अमुचा देश महान्
हा भारत देश महान्

काश्मीरापासून विहंगम सिंधुसंगमा जावा
नेत्रांपुढती शत चित्रांचा सुंदर साज सजावा
कधि विशाल पर्वतमाला
कधि अफाट हिरवी राने
कधि झुळझुळत्या गिरिबाला
कधि रेतीची मैदाने
गंगेपासून तुंगेपावत अखंड हे वरदान
हा भारत देश महान्

किति शेतकरी खळ्यात मळ्यात दिसती
किति कातकरी डोंगरदरीला वसती
किति कामकरी घामानं भिजुनी हसती
कुणि दर्यावरी पाण्याची शेती कसती

अगणित जनगण बहुभाषी अन् बहुधर्मी बहुवेषी
एकदिलाने प्रेमभराने नांदति भारत देशीं
निजकलह विसरले सारा
प्रेमाचे जडले बंध
झंकारित झाल्या तारा
गीताला प्रीतिसुगंध
कंपित मंथर अंतर गाते प्रेमाचे मधुगान
हा भारत देश महान्

अहा साळी झुले आसामच्या शेतात राया
अहा होडी डुले केरळच्या पाण्यात राया
अहा केशर फुले झेलमच्या बनात राया
अहा होरी खुले गोरीच्या मनात राया

अधिर पदांनी रुधिर धावते एकच ताल तयाला
कोटिकोटि कंठांतुन आली लहरत ही स्वरमाला
गगनात दुंदुभी वाजे
थरथरली वसुधामाई
दश दिशा प्रकाशित झाल्या
लहरींतुन सागर गाई
जय जय भारत, जन ललकारत उधळुन पंचप्राण
हा भारत देश महान्

## १९ : दीप लागले

दीप लागले असंख्य अंतरीं दिगंतरीं
जनतेच्या अंतरीं
दीप लागले असंख्य भरतभूमि-मंदिरीं

गहन घोर काळरात्र संपली
भयद करुण प्रलय-घडी लोपली
ये नवी पहाट आज आपली
सावधान, सुखनिधान येतसे घरोघरी

वैराचे प्रखर घाव साहिले
शतकांचे स्वप्नभंग पाहिले
हसत हसत प्राणपुष्प वाहिले
होशियार, व्हा तयार, ज्योत ही जपा उरी

विविधरूप विविध सकल रंग हे
भिन्न देह एक अंतरंग हे
एक सागरातले तरंग हे
साभिमान, ये उधाण आज लोकसागरीं

महाराष्ट्रगौरव



२० महाराष्ट्र-जयगान

२१ केवळ माझा सह्यकडा

२२ हे रायगडाचे कडे

२३ छत्रपती शिवराय

२४ शिवाचा झाला जयजयकार

२५ मायभवानीची आरती

## २० : महाराष्ट्र-जयगान

जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र हा गर्जा जयजयकार
जय वारकरी, जय धारकरी, जय शिवबाची तलवार

जय अमुची प्राकृत वाणी
जय सप्तशतीतिल गाणी
जय संतकवी, जय पंतकवी, जय तंतकवी रसदार

जय यादववंशी राणा
जय शिवरायाचा बाणा
जय भीमथडी, जय वीरगडी, जय रांगडेच सरदार

जय रायगडाचा माथा
जय सिंहगडाचा ताठा
जय सह्यगिरी, पाताळदरी, जय सिंधुदुर्ग झुंजार

जय वऱ्हाडचे आजोळ
जय अजंठा नि वेरूळ
जय बारा मावळ, वाई जावळ, रांगडेच सरदार

जय गोमांतक रंगेल
जय कोल्हापूर रगेल
जय लाल वाट, जय तुंग घाट, जय कृष्णेची जलधार

जय तुळजा तुळजापुरची
जय माय भवानी अमुची
जय भावपंढरी, शिखर जेजुरी, जयतु देव मल्हार

जय सकल लोकमान्यांचा
जय सगळ्या सामान्यांचा
जय शेतकरी, जय कामकरी, जय स्वाभिमान साकार

## २१ : केवळ माझा सह्यकडा

भव्य हिमालय तुमचा अमुचा केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजिन रायगडा
तुमच्याअमुच्या गंगायमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हाला, बोल रांगडा प्यार मला
खिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते, तुकयाचा आधार मला
धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती
या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यातुन अजुनी वाहतसे लाव्हा सगळा

कबीर माझा, तुलसी माझा, ज्ञानेश्वर परि माझाच
जयदेवाचा जय बोला परि माझा नाम्याचा नाच
जनीं जनार्दन बघणारा तो 'एका' हृदयीं एकवटे
जनाबाइच्या ओवीमध्ये माझी मजला खूण पटे
इंद्रायणिच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी मी तिचाच ऐशी जवळिक कायमची झाली
भक्तीचा मेळा दाटे
चोख्याची पैरण फाटे
निर्गुण मानवतेची पूजा करणारे करु देत भले
माझ्यासाठी भीमाकाठीं भावभक्तिची पेठ खुले

रामायण तर तुमचेमाझे भारत भारतवर्षाचे
छत्रपतीची वीरकहाणी निधान माझ्या हर्षाचे
रजपूतांची विक्रमगाथा तुमच्यापरि मजला रुचते
हृदयाच्या हृदयात परंतू बाजी बाजीची सुचते
अभिमन्यूचा अवतारच तो होता माझा जनकोजी
दत्ताजीचे शेवटचे ते शब्द अजुनि हृदयामाजीं
बच जायें तो और लढें। पाउल राहिल सदा पुढे
तुम्हास तुमचे रुसवे फुगवे ध्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठी राहिल गाठीं मरहट्ट्याचा हट्ट खरा

तुमचे माझे ख्याल तराणे, दोघेही ऐकू गझलां
होनाजीची सोनलावणी वेड लावते परि मजला
मृदंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ वीणा अन् मुरली
थाप डफाची कडकडता परि बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनि माझ्या हृदयकवाडा तोच पवाडा दुमदुमला
तटातटा तुटती बंद। भिवईवर चढते धुंद
ओठ हात देहात अचानक वादळ घुसमटुनी जाते
उचंबळे हृदयात पुन्हा ते इतिहासाशी दृढ नाते

कळे मला काळाचे पाउल द्रुत वेगाने पुढति पडे
कळे मला क्षितिजाचे वर्तुळ क्षणोक्षणीं अधिकचि उघडे
दहा दिशांचे तट कोसळले, ध्रुव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहू पसरुन अवघ्या विश्वातें कवळी
विशाल दारे माझ्या घरची खुशाल ही राहोत खुली
मज गरिबाची कांबळ्याकळ सकलांसाठी आंथरली
मात्र भाबड्या हृदयात। तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुनि झंझावात
कोटि कोटि छात्यांचा येथे कोट उभारू निमिषात

# २२ : हे रायगडाचे कडे

छत्रपतींची अजिंक्य विजयी नौबत जेथे झडे
उभे हे रायगडाचे कडे

कातळकाळी उघडी छाती
अंगावर खड्गांची पाती
चिलखतधारी सुलतानांना वेडावित नागडे
उभे हे रायगडाचे कडे

जखमांची उरिं मिरवत नक्षी
इथुन उडाला दिगंत पक्षी
कैक विषारी नागकुळांचे मोडुन पडले फडे
उभे हे रायगडाचे कडे

अदिलशहाची दौलत बुडली
अलमगिराची निद्रा उडली
मर्द मराठी पराक्रमाचे दुमदुमले चौघडे
उभे हे रायगडाचे कडे

उन्मत्तांनो जपुन पुढे व्हा
या काळाच्या दाढा जिव्हा
अन्यायाचा छळजुलुमाचा येथे फडशा पडे
उभे हे रायगडाचे कडे

स्वातंत्र्यास्तव जे जे जागृत
त्या सर्वांचे हे कुळदैवत
विश्वामधल्या शिवशक्तीचे शाश्वत मंदिर खडे
उभे हे रायगडाचे कडे

हे शिवसुंदर मंदिर बघता
क्षणभर थांबे रवि मावळता
दिग्गज आणति अभिषेकाला स्वर्गंगेचे घडे
उभे हे रायगडाचे कडे

## २३ : छत्रपती शिवराज

समरात उभा हा शेर, फिरे समशेर, काय हे तेज
दुंदुभी दुमदुमे नभीं, यमाला न भी धन्य शिवराज

हा डोंगरातला चुव्वा
गनिमाचा उडवी धुव्वा
अवतरे नवा अवतार करी संहार खलांचा आज
हा धन्य धन्य शिवराज

वाजताच याचा डंका
जुलुमाची जळली लंका
शंका न शहाला उरे, कापरे भरे, ढळे शिरताज
हा धन्य धन्य शिवराज

संगती सोबती आले
हातात झेलुनी भाले
ते शूर मावळे गडी, उरीं घोंगडी, फाटका साज
हा धन्य धन्य शिवराज

पावली भवानी आई
शिरिं छत्र धरी तुळजाई
जय छत्रपती शिवराज, गरीबनवाज, घुमे आवाज
हा धन्य धन्य शिवराज

## २४ : शिवाचा झाला जयजयकार

रायगडाच्या माथ्यावरुनी आज उठे ललकार
सिंहासनिं शिवराय बैसले, झाला जयजयकार
शिवाचा झाला जयजयकार

संपला घोर अंधार घनदाट अमावास्येचा
स्वातंत्र्यसूर्य ये उदया अंबरीं रंग आशेचा
जय महाराष्ट्रमातेचा
जय अभिमानी जनतेचा
जय बोला छत्रपतींचा
आकाशातुन दहा दिशांतुन घुमला स्वरझंकार
शिवाचा झाला जयजयकार

नीतीच्या वेदीवरती शिवबाचे सिंहासन हे
शक्तीसह नांदे भक्ती न्यायाचे आश्वासन हे
विक्रमासवे विनयाचे
विभवासह वैराग्याचे
हे स्थान राजयोग्याचे
आदर्शांचा अक्षय ठेवा, सत्याचा सत्कार
शिवाचा झाला जयजयकार

चांदवा निळ्या गगनाचा नक्षत्रमण्यांनी सजला
अवकाश विश्वसदनाचा आनंदघनाने भिजला
ये स्वर्गसुखाचे पर्व
तोम् तनन गाति गंधर्व
धरि ताल चराचर सर्व
कोटिकोटि कंठांतुन उसळे हृदयाचा हुंकार
शिवाचा झाला जयजयकार

नभिं वाजे मृदंग, जन हर्षात दंग, उठे तालतरंग
लाख हृदयांतुनी
याच्या कीर्तीचा रंग, सदा राही अभंग, गुग गाण्यात गुंग
झाले सारे गुणी
शिवरायाचे नाम, हे अमुचे इनाम, इथे या रे तमाम
हिंद देशातुनी
शिवरायाचा जय, मिळे आम्हा अभय, स्वर्गपृथ्वी उभय
त्याच्यापुढे उणी

## २५ : मायभवानीची आरती

जय अंबे जगदंबे जय तुळजामाई
शरणागत भक्तांवर करुणा कर आई

दुमदुमवी गीत तुझे दख्खनचा वारा
हट्टी मरहट्टयांच्या हृदयीं गाभारा
गोदा कृष्णा गाती गंधांकित गाथा
मंगल मंदिर सुंदर सह्याद्री-माथा
कळस तुझा सोन्याचा गिरि कळसूबाई


सिंहासन सत्ताविस गडकोटांवरती
पायतळीं पायघडी मऊ काळी धरती
पांगारे-पळसांच्या चवऱ्या तुजभवती
भरलेल्या कणसांच्या पलित्यांच्या ज्योती
जळते संकटसमयीं समशेरच समई

माथ्यावर रत्नांची करवंदी जाळी
असुरांच्या रक्ताचे कुंकुम तव भाळीं
निढळाच्या मोत्यांची तव कंठीं माळा
नामश्रवणें केवळ धडकी कळिकाळा
छळणारे खळ घालति लोटांगण पायीं

तुझिया पूजेसाठी मेघांची भेरी
अभिषेका हस्ताच्या धारांची झारी
रविचंद्रांच्या झांजा वाजति अवकाशीं
मायभवानी दर्शन दे हृदयाकाशीं
मोक्षाचा वर वरदे विश्वाला देई

# नव्या प्रेरणा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)



२६ बिजली
२७ मानव तितुका एकच आहे
२८ सावकारशाही ठेवायची नाही
२९ वीर उतरले हो
३० नव्या जगाची आण
३१ छोटेसे बहीणभाऊ
३२ नव्या जगाचे नायक आम्ही
३३ समाजवादी साथी गाती
३४ हसरे तारे
३५ माझा गणेश
३६ तुज येईल कशी जागती
३७ आभाळाची अम्ही लेकरे
३८ हे वाण सतीचे जाण
३९ गात रहा रे गात रहा
४० सदैव सैनिका पुढेच जायचे

## २६ : बिजली

बिजली नाचेल गगनात । वादळ होईल जोसात
जंगल जळेल वणव्यात । मंगल होईल देशात

बिजली कडाड गर्जेल । पाउस धडाड येईल
पाणी चढेल शहरांत । पाणी जिरेल शेतांत

बिजली त्रखून कोसळते । सावध हवेलि ढासळते
जाइल हवेलि मातीत । घरटं राहील शाबूत

बिजली कुणाला जाळील । बिजली कुणाला उजळील
बिजली येईल अवचीत । न्याय करील जगतात

बिजली कुठून येईल । वादळ कुठून होईल ?

शेतकऱ्यांच्या शेतांमधुनी, औतं फिरती, जमीन खणती,
लाख ऐरणी घण खणखणती, घरांत घरघर जाती फिरती,
भिंति लिंपती, मळे शिंपती, विळे चालती, विटा भाजती,
पाठीवरुनी पाट वाहती, कैक करवती कुरकुर करती,
मडकी घडती, चिखल तुडविती, कोणी विणती, सारे कण्हती
या औतांतुन, हातोड्यांतुन, या जात्यांतुन, या पात्यांतुन
या भात्यांतुन, या दात्यांतुन, या कामांतुन, या घामातुन,
या अश्रूंतुन, या अग्नीतुन
ठिणगी फुटेल जोसात । येईल विजेच्या वेषात

## २७ : मानव तितुका एकच आहे

मानव तितुका एकच आहे
        नीच न कोणी उच्च न कोणी
हाच आपुला धर्म खरोखर
        हीच आपुली शाश्वत वाणी

स्वतंत्रतेने मानव राहो
        असोत राष्ट्र स्वतंत्र सारी
पृथ्वीची तर सर्व लेकरे
        कोण धनी अन् कोण भिकारी ?

या तरुणांनो, वेद जपा हा
        जपा जपा हे दिव्य कुराण
हाच अवेस्ता वाचा सारे
        वाचा हेची खिस्त-पुराण

पददलितांना उचलुनि घ्यारे
प्रेमालिंगन द्या दीनांस
पशुत्व सोडुनि मानव व्हा रे
नवधर्माचा घ्या रे ध्यास

उन्मत्तांना नमवायाते
खुशाल बांधा ना कमरा
कलह न करिता एकजुटीने
लढूनिया जिंकू समरा

आज जगातिल धर्मांना या
अधर्मपण जणु का आले
परस्परांतिल भांडण केवळ
स्वधर्म-वैभव का झाले

राष्ट्रधर्म हा नाही अपुला
मानव-धर्म न हा जाणा
एकी-शांती-त्याग असे हा
नव धर्माचा नव बाणा

या धर्माचे दूत होउनी
फिरा फिरा मग विश्वात
सेवा-समता-संघटनेची
द्वाही फिरवा जगतात

## २८ : सावकारशाही ठेवायची नाही

या ऽ गरिबानुं या, झेंडा हातीं घ्या, शाहीरी हाक तुम्हा हाय हो
सावकारशाही ठेवायची नाही, ठेचायची आता हाय हो

मजल्यावर मजले, डौलात सजले, नजर ठरत नाय हो
झापांची झोपडी, अंधारी बापडी, रंकाच्या नशिवी हाय हो

मोटार जांभळी, भरधाव धावली, बसून भावली जाय हो
रानातल्या वाटे, तुडवून काटे, रंकाचे फाटले पाय हो

आला उन्हाळा, पडद्यास्नी वाळा, झळीचं नाव कुठं नाय हो
रंकाला मात्र, वाभळीची छत्रं, संगतीला कुत्रं हाय हो

हुक्क्यावर फुंकर, घालायला नोकर, थंडीत लोकर हाय हो
रंकाला मात्तर, नेसायला लक्तर, झोपायला फत्तर हाय हो

बगीचा फुलला, रंगानं खुलला, वाऱ्यानं झुलला हाय हो
खडक फोडून, जंगल तोडून, कंबर मोडून जाय हो

चांदीच्या ताटात, जेवायचं थाटात, मिठाई पोटात जाय हो
मातीची मडकी, जवार किडकी, रंकाला सण कधी नाय हो

क्रांतीचा झेंडा, पुकारि बंडा, शाहीरी हाक तुम्हा हाय हो
अन्याव मिटवा, जुल्म हटवा, मोलाची घटका जाय हो

## २९ : वीर उतरले हो

वीर उतरले हो, उतरले हो, उतरले रणमैदानीं
आमची नवी नीती, आमची नवी रीती, आम्ही सोडली भीती
घेतलं निशाण हातीं या मर्दांनी

पहा देशाची झाली कशि दैना
यांना हालवेना त्यांना चालवेना
यांना मनांतली वात कुठे बोलवेना
आमची नवी पिढी, उंच धरली गुढी, सारी सरली अढी,
संकटावर कडी केली मर्दांनी

आमचा शूरांचा देश, आमचा वीरांचा देश
आमचा नवा संदेश, आमचा नवा आदेश
हातीं घेउन कुदळ, श्रमसेनेचं दळ, अंगिं संचारलं बळ
अहो जादूची कळ केली मर्दांनी

## ३० : नव्या जगाची आण

तुझ्या कामामधुन तुझ्या घामामधुन उद्या पिकंल सोन्याचं रान
चल उचल हत्यार गड्या होउन हुषार
तुला नव्या जगाची आण

तुझ्या घणाच्या घावामधुन
उठे उद्याच्या जगाची आस
तुझ्या घामाच्या थेंबामधुन
पिके भुकेल्या भावाचा घास
तुझ्या ध्यासामधुन, तुझ्या श्वासामधुन
जुळे नव्या जगाचं गान

तुझ्या पोलादी टाचेखालुन
जित्या पाण्याचे निघतिल झरे
तुझ्या लोखंडी दंडामधुन
वाहे विजेची ताकद कि रे
चल मारुन धडक, उभा फोडू खडक,
आता कशाची भूकतहान

भाग्य लिहिलेलं माझं तुझं
घाम आलेल्या भाळावरी
स्वप्न लपलेलं माझं तुझं
इथे बरड माळावरी
घेउन कुदळखोरं, चला जाऊ म्होरं,
देउ देशाला जीवनदान

## २१ : छोटेसे बहीणभाऊ

छोटेसे बहीणभाऊ
उद्याला मोठाले होऊ
उद्याच्या जगाला, उद्याच्या युगाला, नवीन आकार देऊ

ओसाड उजाड जागा
होतील सुंदर बागा
शेतांना मळयांना फुलांना फळांना नवीन बहार देऊ

मोकळ्या आभाळीं जाऊ
मोकळ्या गळ्याने गाऊ
निर्मळ मनाने आनंदभराने आनंद देऊ अन् घेऊ

प्रेमाने एकत्र राहू
नवीन जीवन पाहू
अनेक देशांचे, भाषांचे, वेषांचे, अनेक एकच होऊ

## ३२ : नव्या जगाचे नायक आम्ही

गतकाळाची होळी झाली, धरा उद्याची उंच गुढी
पुराण तुमचे तुमच्यापाशी, ये उद्याला नवी पिढी

ही वडिलांची वाडी तुमची, तुम्हास ती लखलाभ असो
खुशाल फुटक्या बुरुजावरती पणजोबांचे भूत वसो
चंद्रावरती महाल बांधू, नको अम्हाला जीर्ण गढी

देव्हाऱ्यातिल गंधफुलांतच झाकुन ठेवा ती पोथी
अशी बुद्धिला भूक लागता कशी पुरेल अम्हा बोथी
रविबिंबाच्या घासासंगे हवी कुणाला शिळी कढी

शेषफणेवर पृथ्वी डोले ! मेरूवरती सूर्य फिरे !
स्वर्गामध्ये इंद्र नांदतो ! चंद्र राहुच्या मुखीं शिरे !
काय अहाहा बालकथा या एकावरती एक कडी

दहा दिशांतुन अवकाशातुन विमान अमुचे भिरभिरते
अणुरेणूंचे ग्रहगोलांचे रहस्य सारे उलगडते
नव्या जगाचे नायक आम्ही, तुम्ही पुजावी जुनी मढी

## ३३ : समाजवादी साथी गाती

समाजवादी साथी गाती एका आवाजात
ध्येयाचे हे गीत घुमवू अवघ्या अवकाशात

दैवत नांगरधारी आम्हा बळिराजा
घामाने जे न्हाले करु त्यांची पूजा
कसणारांची केवळ होऊ दे धरणी
श्रमणारांची आता होऊ दे गिरणी
ध्येय अमुचे हे ठरले
कार्य दुसरे ना उरले
क्षणभर आता राहु न आम्ही शांत कधी ना शांत

मजुरांवरती जगुनी माजुर जे बनले
ऐदी ऐती गादी बळकावुनि बसले
एकजुटीने त्यांना देऊ या ग्वाही
'कामकरी राज्याची फिरली हो द्वाही'
ध्येय अमुचे हे ठरले
कार्य दुसरे ना उरले
क्षणभर आता राहु न आम्ही शांत कधी ना शांत

एकच नांगर लाखो फाळांचा करुनी
फिरवा शेतकऱ्यांनो अन्यायांवरुनी
कामकऱ्यांनो उचला घण लाखो हातीं
जुलमी प्रासादांना दाखविण्या माती
शेतकरी अन् कामगार
लढा लढाया व्हा तैय्यार
क्षणभर आता राहु नका रे शांत कधी ना शांत

## ३४ : हसरे तारे

या रे सारे हसरे तारे या रे वीरकुमार
या धरतीला आपण देऊ नित्य नवा आकार

राज्य पऱ्यांचे स्वप्नीं दिसते
ते सकलांना सांगत असते
सौंदर्याच्या भव्य कल्पना तुम्ही करा साकार

दीन जनांचे पुसुनी आसू
फुलवा त्यांच्या वदनीं हासू
पराक्रमाने द्या धरतीला वैभव अपरंपार

दुःख कशाला जुन्या जगाचे
तुम्हीच राजे नव्या युगाचे
भवितव्याच्या उज्ज्वल भुवनीं मग कसला अंधार

## ३५ : माझा गणेश

त्रैलोक्य व्यापुनीही    कोठे न राहणारा
माझा गणेश नाही    मखरात मावणारा

नक्षत्रमंडलाची    माथ्यावरी झळाळी
आरक्त सूर्य भाळीं    सिंदूर लावणारा

मूर्ती अमूर्त याची    रेखाल काय चित्रीं
विज्ञानरूप सूत्रीं    भूगोल ओवणारा

स्वार्थी लबाड लोभी    रोगी अपत्यकामी
येता पवित्र धामीं    हाकून लावणारा

भक्तांस नाकळे हा    पोथीतुनी पळे हा
संशोधका मिळे हा    सत्यास पावणारा

आहे प्रकाशरूपें    विश्वात कोंदलेला
रेणूत कोंडलेला    बुद्धीस भावणारा

## ३६ : तुज येइल कशी जागर्ती

गोरगरिब मारति लइ हाका
शिरमंत घालतात डाका
समय लइ बाका, बाका तुजवरती
तुज येइल कशी जागर्ती, शेतकरी राजा

काकरिभर जिमिनिचा नाहि पत्ता
कांवळिविण नाही मालमत्ता
उरलि नाहि सत्ता, सत्ता कशावरती
तुज येइल कशी जागर्ती, शेतकरी राजा

खेडीपाडी ओस झाली, कुणी कुणा नाही वाली
उपासमार झाली मेली बारा बलुती
पाटिल मारी कुळकर्ण्याला, कुळकर्णी बी तलाठ्याला
ज्याच्या त्याच्या जाचाखाली म्हारं मरती

साळी माळी कुणबी कोळी, सुतार सोनार आळीपाळी
एकमेकांवर कसे गुरगुरती
सोनियाचे दीस सांगा, यात्रे कसे महारमांगां
आपसांत शिविगाळी तेही करती

राजा वैऱ्याची रात
तुझ्या वैऱ्याची होइल मात
तू जुटीनं चाल एकसाथ
ऐक ऐक शाहिराची बात, शेतकरी राजा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## ३७ : आभाळाची अम्ही लेकरे

आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही

श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही

इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही

माणुसकीचे अभंग नाते
अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही

कोटि कोटि हे बळकट बाहू
जगन्नाथ–रथ ओढुन नेऊ
आस वेगळी नाही आम्हा ध्यास वेगळा नाही

## ३८ : सतींचे वाण

हे वाण सतीचे जाण तुच्छ स्वप्राण वाहतो आण
स्वार्थात भविष्यामधी न होऊ कधी कधी रममाण

जाळून खोपटी तुम्हा हवेली हवी
किति मोहक वचने देता फसवी नवी
झुंजार करुनि निर्धार यापुढे पार पेटवू रान

राबती कुणी शेतात भूमिचे धनी
त्या लुबाडण्याचे बेत रचावे मनी
किति आस दुष्ट ही खास परी भूदास मांडतिल ठाण

अज्ञान यापुढे शेतकऱ्यांचे जळो
कल्याण आपुले सदा तयांना कळो
ते स्वतां आपुले आता पाहतिल हिताहिते कल्याण

सहकार वाढु दे दीन किसानांतला
एकिने नष्ट हो दुष्ट दैत्य मातला
अन्याय बघुन ये चीड घालवू कीड गाउ निर्भीड क्रांतिचे गान

## ३९ : गात रहा रे गात रहा

गात रहा रे
गात रहा रे
गात रहा रे गात रहा मधुगान

पूस जगाचे आसू
सकल दिशांतुन घोर निशांतुन पेरित जा तू हासू
जीवन हे वरदान

सत्य सनातन दे तुज हाक,
दे तुज हाक, दे तुज हाक
अखिल चराचर गाते, तू धरि रे धरि रे ताल
फुलव सुरांनी रान

जाळुन टाक निराशा
जा फुलवित तू आशा
या छंदाला आनंदाला देइ सुरांची भाषा
किलबिल करती पक्षी
वनिं वनिं भुवनीं रेखित जाती मधुर सुरांची नक्षी
छेड तुझी तू तान

जरि तुज जागोजागी
दिसतिल कुणि हतभागी
दे संजीवन दे नवजीवन तू त्या दीनांलागी
देउ नको तू करुणा
आकांक्षांचे नूतन लोचन दे सकलां नवतरुणां
शिकव नवा अभिमान

## ४० : सदैव सैनिका पुढेच जायचे

सदैव सैनिका   पुढेच जायचे
न मागुती तुवा   कधी फिरायचे

सदा तुझ्यापुढे   उभी असे निशा
सदैव काजळी   दिसायच्या दिशा
मधून मेघ हे   नभास ग्रासती
मधेच या विजा   भयाण हासती
दहा दिशांतुनी   तुफान व्हायचे
सदैव सैनिका   पुढेच जायचे

प्रलोभने तुला   न लोभ दाविती
न मोहबंधने   पदांस बांधती
विरोध क्रोध वा   तुला न थांबवी
न मोह भासतो   गजान्त वैभवीं
न दैन्यही तुझे   कधी सरायचे
सदैव सैनिका   पुढेच जायचे

वसंत वा शरद्   तुला न ती क्षिती
नभात सूर्य वा   असो निशापती
विदीर्ण वस्त्र हो   मलीन पावले
तरी न पाय हे   कधी विसावले
न लोचनां तुवां   सुखें मिटायचे
सदैव सैनिका   पुढेच जायचे

नभात सैनिका   प्रभात येउ दे
खगांसवे जगा   सुखात गाउ दे
फुलाफुलावरी   सुवर्ण शोभु दे
जगास शांतता   सुहास्य लाभु दे
न पाय तोवरी   तुझे ठरायचे
सदैव सैनिका   पुढेच जायचे

# संग्रामाची गाणी



४१ चला उगवतीकडे
४२ इंच इंच लढवू
४३ या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान
४४ डंका
४५ राहतील मागे का भारतीय नारी
४६ सिंहगर्जना
४७ तांडव
४८ झेंडा स्वर्गावर चढवा
४९ शपथ
५० जय स्वतंत्रता जय जनसत्ता
५१ करा आनंदी आनंद
५२ जयतु जयतु भरतभूमि
५३ लाल लाडके देशाचे
५४ घाल शिपाई घाव

## ४१ : चला उगवतीकडे

स्वातंत्र्याचा सूर्य आपला लाल धुळीने बुडे
खुनशी घाला पडे, चला रे चला उगवतीकडे

बंधुभाव दावून घातली उरीं घातकी सुरी
जखम धरा दाबून, चला रे पुढे सरा संगरीं
रणांगणावर रिपुरुधिराचे खुशाल घाला सडे

नेफावर तोफांचा ताफा, लक्ष लाल संगिनी
भय कोणाला त्यांचे भिडता जवान रणरंगणीं
झुंजारांनो भुजा उभारा, विजयी झेंडा चढे

स्वातंत्र्याची ज्योत भारतीं हृदयीं हृदयीं जळे
'मारू किंवा मरू' मंत्र हा मायदुधातुन मिळे
खडे राहिले रणांत हट्टी पहा पहाडी कडे

मुंग्यांच्या रांगांपरी आली चालुन पिवळी दळे
कशी दडपता येतिल त्यांना रक्तातिल वादळे
इथे मस्तके तुटली तरिही लढत राहती धडे

वीरांनो ! तुमच्यावर वरुनी देव फुले वाहती
नयनांतिल नीरांजन लावुन दिशा उभ्या राहती
झणण झडाया झाले आतुर विजयाचे चौघडे

## ४२ : इंच इंच लढवू

उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू
अभिमान धरू, बलिदान करू, ध्वज उंच उंच चढवू

परक्यांचा येता हल्ला
प्रत्येक घर बने किल्ला
हे कोटि कोटि भुजदंड
होतील इथे ध्वजदंड
छातीची करुनी ढाल, लाल या संगिनींस भिडवू
उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू

बलवंत उभा हिमवंत
करि हैवानांचा अंत
हा धवलगिरी हा नंगा
हा त्रिशूळ कांचनगंगा
जरि झुंड पुंड शत्रूंची आली, खिंड खिंड अडवू
उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू

जरि हजार अमुच्या जाती
संकटामधे विरघळती
परचक्र येतसे जेव्हा
चौदांची एकच जिव्हा
मग पक्ष पंथ जरि लक्ष आमुचे, सागरात बुडवू
उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू

राष्ट्राचा दृढ निर्धार
करु प्राणपणें प्रतिकार
ह्या नसानसांतिल रक्त
जाळील आसुरी तख्त
आम्ही न कुणाचे दास, नवा इतिहास पुन्हा घडवू
उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू

अन्याय घडो शेजारी
की दुनियेच्या बाजारीं
धावून तिथेही जाऊ
स्वातंत्र्य-मंत्र हा गाऊ
स्वातंत्र्य, बंधुता, समता यांचा घोष सदा घुमवू
उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू

## ४३ : या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान
दिसला त्याला तपीं बैसला दुरून गिरि हिमवान्

गंगेच्या अंगावर दिसला झुलता हिरवा साज
यमुनातीरीं संगमरवरी चंद्रमण्यांचा ताज
पंचनद्यांची अक्षय थाळी बहार झेलमवरचे
गगन-मांडवा खांब रोविले माड दक्षिणेवरचे
परी न दिसले त्याला इथले जिते लोह-पाषाण
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

चहामळ्यांचा तेलनळ्यांचा वास हुंगिला कोठे
ओल्या हिरव्या गहुलोंब्यांच्या श्वासाचे सुख मोठे
असेल त्याला फुलबागांची चाहुल आली मंद
चंदनचर्चित मूर्तींचा वा असेल आला गंध
तया न झाले जगदंबेच्या धूपाचे परि भान
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

लाटांवरल्या वाटा चुकले नावाड्यांचे गीत
त्यांत तयाला असेल कळली कंथाघरची प्रीत
मंजुळ मुरली नभात भरली असेल पडली कानीं
तयें ऐकली विव्हळ वीणा घायल कोयलवाणी
नसे ऐकले त्याने इथले हरहर भैरवगान
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

वाऱ्यावरती वहात गेला अंगाईचा स्पर्श
मतिमंदाला अंदाजाने कळे गुलाबी हर्ष
मदनतरूवर फुलवित मोहर पवन चले पुरवैय्या
दक्षिण दर्या इथे आंथरी रेतीची सुखशय्या
झुंजारांचया भुजांत लपले कळे न त्यास तुफान
या गनिमाला नाहीं कळला अजून हिंदुस्तान

शेतमळयांतिल दिसले असतिल किसान त्या कष्टाळू
असतिल दिसल्या जात्यावरल्या दळणाऱ्या कुणि साळू
घामाने भिजतात सावल्या गिरण्यांतुन खपताना
मापुन मोजुन जरा वाकल्या मेजावरल्या माना
परि सर्वांच्या नसानसांतुन धगधगतो अभिमान
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

जाट-शीख-रजपूत कुळांची उगा न जगतीं ख्याती
कळिकाळाला कळली आहे मर्द मराठी छाती
काय घेतले तृण कापाया विळे कोयते हातीं
भाला बरची पिकवी घरची कृष्णातिरची माती
विळे कोयते करतिल येथे शत्रूचे शिरकाण
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

# ४४ : डंका

मर्दांनो ! गर्जून करा या भ्याडांचा धिक्कार
प्रेम दावुनी मान दाबुनी कुशीत केला वार

अफझुल्ल्याची ही संताने
ठेचुन टाका पराक्रमाने
शिवरायाची शपथ तुम्हाला चला करा निर्धार

पिवळ्यांचा हा काळा कावा
रणमर्दांना पुरता ठावा
लोहपहाडी छातीवर हो बोथट खंजिरधार

दहा दिशांतुन तुफान उठले
लाल दळांना झोडित सुटले
पुन्हा न करतिल या भूमीला शिवण्याचा अविचार

शीख राजपुत मर्द मराठा
स्वातंत्र्याचा अभंग ताठा
चीन कशाला, कळिकाळाला भिडतिल रणझुंजार

ही वैऱ्याची रात्र काजळी
ऊठ जवाना पोत पाजळी
काढ वेचुनी टाक ठेचुनी बाहीतिल अंगार

'जय भारत' गर्जून उठा तर
हिमालयावर घुमवा 'हर हर'
वाजत राहिल तुमचा डंका सात सागरापार

## ४५ : राहतील मागे का भारतीय नारी

कोटि कोटि वीर पुरुष समरवेषधारी
राहतील मागे का भारतीय नारी
समय विकट येता

एक हा विचार
मानसात दिवसरात एक हा विचार
समर निकट येता

जाहले स्वराज्य-समर । हसत हसत कसुनि कमर
शूर युवति शत्रुपुढति समरिं ठाकल्या
प्राण-आहुती रणात सहज टाकल्या
समर निकट येता

ही परंपरा अजून । ठेवली असे जपून
अजय अभय, युवक-युवति लढति भारतीं
देव-देवता तयांस गाति आरती
समर निकट येता

येउ दे रणात चीन । आम्हिही मुळी न दीन
भारतीय युवक-युवति भय न जाणती
अमर समरगीत गात विजय आणती
समर निकट येता

उंच उंच अंबरात । तीन रंग लहरतात
दिव्य ते अशोकचक्र तळपते पहा
सांगण्यास दुष्मनास " दूर तू रहा "
समर निकट येता

## ४६ : सिंहगर्जना

सिंहगर्जना होता अवघे जाय थरारुन रान
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकति रणमैदान

रोहिडेश्वराच्या पुढती गर्जला जसा तो शिवबा
औरंगजेब दरबारीं रागाने गर्जे संभा
कोंडाण्यावर लढताना करि घोष वीर तानाजी
कापता कळस सोन्याचे संतप्त वदे संताजी
उत्तरेत संचरताना बोलला कितीदा बाजी
अन् पानपतावर पडता बेहोष म्हणे दत्ताजी
झाशीची राणी लक्ष्मी बोलली तेच संतापें
काल्पीवर कोसळताना जे वदले तात्या टोपे
'हर हर हर हर महादेव हो ठार करा दुष्मन'
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकती रणमैदान

गर्जला चितोडावरुनी जों रत्नसिंह रणगाजी
कापला भयानें जेव्हा तो अल्लाउद्दिन खिलजी
पृथ्विराज चौहानाने गर्जून सोडला तीर
अन् हळदी घाटामध्ये गर्जले प्रतापी वीर
जय एकलिंग हा नारा उठला जों मेवाडात
थरथरल्या मोगल सेना दिल्लीच्या मैदानात
गोविंदसिंह गुरु जेव्हा शीखांना दे तलवार
अन् तेजबहादुर, बंदा वाऱ्यावर झाले स्वार
'सत् श्री अकाल' या घोषाने दुमदुमले अस्मान
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकति रणमैदान

या साऱ्या रणघोषांची एकत्र जाहली शक्ती
नवजवान हृदयीं आता भरलेली भारतभक्ती
हिमशिखरांवरुनी येतो 'जयहिंद' एक हा नारा
सीमेच्या गगनावरती विजयाचा एकच तारा
हे जवान भारतभूचे सिख-मुस्लिम-हिंदु-इसाई
सर्वांच्या हृदयीं मंत्र जय जय रे भारतमाई
रावीच्या तीरावरती डौलात तिरंगा डोले
जय हिंद पुन्हा जय हिंद जय हिंद तीनदा बोले
जय जय भारत हे ललकारत लढती वीर जवान
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकती रणमैदान

## ४७ : तांडव

रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका
उंच उसळल्या काळसागरीं डगमग करिते लंका

पिंग जटांच्या विजाळ गगनीं चंद्र खातसे झोले
पवित्र घेता युद्धपवित्रा धरणी चरणीं डोले
विकट हासती कंठीं कवट्या, ओकति नाग विषार
गर्र खातसे गिरकी गंगा उडवित अग्नितुषार
उठा उठा रे अवघे जनगण मनात कसली शंका
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका

रुद्राच्या रणयज्ञामाजी या रे दीक्षा घ्याया
विश्वामधले असुर मातले असुद्र त्यांचे प्याया
पंचप्राणहि अपुरे पडतिल तिथे न फेका नाणे
सर्वस्वाचा होम हवा रे नकोत मुठभर दाणे
भाळावरती लावुन या तर निजरुधिराच्या पंका
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका

दिले जयाला अभयासाठी शिवमंगल वरदान
तोच उलटुनी पडला तुटुनी लुटुनी घ्याया प्राण
रुद्र शुभंकर हो प्रलयंकर काळ बने दैत्यांचा
या रे जनगण रुद्रासंगे अवघे थयथय नाचा
त्रिभुवन झाले आज रणांगण ऐका भैरवशंखा
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका

तांडव भुवनीं, तांडव गगनीं, तांडव अगणित चित्तीं
पार उडाली मोहननिद्रा जागृत हो चित्‌शक्ती
पर्वत ढळले उंच उसळले खवळुन शौर्यसमुद्र
वीरभद्र भिरकावुन उठले प्रपंचपोथी क्षुद्र
वीर निघाले क्षाळायाला अवघ्या विश्वकलंका
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका

देवदारुघनजटामंडिता ! हिमवत्‌-चंद्रा ! रुद्रा !
नदनिर्झर-सर्पांकित ! शंकर, भयहर शक्तिसमुद्रा !
सह्य-असह्यशूलधर ! सुंदर विंध्य-गजाजिनधारी !
अद्वितीय तव नेत्र उघडुनी दानवगण संहारी
दिव्य मंत्र हा जपुनी चला रे कलिकाळाला जिंका
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका

## ४८ : झेंडा स्वर्गावर चढवा

धरा हासली गगन निवळले, उजळ दिशांतुन स्वच्छ हवा
जयजयकार करा मातेचा झेंडा स्वर्गावर चढवा

धन्य आमुची भारतमाई
पुत्र पाच तिज हिंदु-इसाई-
शीख-पारसिक-मुस्लिमभाई
निज रक्ताच्या पाच नद्यांचा घडविति ते पंजाब नवा

गुलाब केशर कमल फुलांची
विपुल जलाची हरित दलांची
काश्मिर भूमी अमुची अमुची
दहा दिशांतुन अवकाशातुन भीष्म घोषणा दुमदुमवा

या देशाच्या अभिमानाचा
विक्रमशाली पराक्रमाचा
शौर्य धैर्य दृढनिश्चय यांचा
कळावया इतिहास भविष्या रस रक्ताचा आज हवा

## ४९ : शपथ

शपथ जवानांची
तरुण तुफानांची
शपथ तुम्हा, शपथ तुम्हा विजयनिशाणांची

शपथ संगिनींची
रुधिररंगिणींची
शपथ तुम्हा, शपथ तुम्हा शूर कृपाणांची

शपथ हमीदाची
शपथ शहीदांची
शपथ तुम्हा भारतीय वीर विमानांची

शपथ भारताची
शपथ भविष्याची
शपथ तुम्हा अंतरिंच्या अटळ इमानाची

## ५० : जय स्वतंत्रता जय जनसत्ता

जय स्वतंत्रता जय जनसत्ता जय जय हिंदुस्तान
चले जाव दुस्मान, ना तरी, दावु तुला अस्मान

तोफेला तोफा भिडवू
विजयाचा डंका झडवू
हे निशाण गगनीं चढवू
जा परतून गुमान, ना तरी, घालू कंठस्नान

आता न दया ना माया
जर मौत हवी तर या या
ठाकलो तुम्हा गाडाया
या पुढती हैवान, या इथे, तुमचे कब्रस्तान

दा. क्र. 23.09.६..
शाखा (स्थळ प्रत)

## ५१ : करा आनंदी आनंद

हर हर महादेव बोला
हाणा एक भीम टोला

जय जय एकलिंग भगवान
पळवा बेइमान हैवान

सत् श्री अकाल की जय हो
अम्हाला कोणाचे भय हो ?

पुकारा आयो गुरखाली
सेना विजयी ही झाली

बोला अल्ला हो अकबर
तिरंगा चढवा गगनावर

गर्जा गर्जा जय हिंद
करा आनंदी आनंद

## ५२ : जयतु जयतु भरतभूमि

जयतु शौर्यशालिनी
जयतु पुण्यदायिनी
जयतु जयतु जयतु जगतिं भरतभूमि मानिनी

सात गगनमंडळात नौबती निनादतात
समरसज्ज ऱ्हा क्षणात दशदिशा बजावतात
जय स्वतंत्र लोकतंत्र वीरमंत्र गात गात
लाख वादळांसमान उतरती दळे रणात
साभिमान तळपुनी
सांगतात संगिनी
जयतु जयतु जयतु जगतिं भरतभूमि मानिनी

रक्त जोवरी नसांत त्राण जोवरी उरांत
भावशक्ति मानसांत प्राण देहपंजरांत
मायभूमि रक्षणार्थ झुंज धुंद संगरात
या अशा उफाळतात लाख ऊर्मि अंतरांत
धडकली पुरी विनी
भडकल्या कडाविनी
जयतु जयतु जयतु जगतिं भरतभूमि मानिनी

## ५३ : लाल लाडके देशाचे

शूर शिपाई पेशाचे
लाल लाडके देशाचे
शिंग तुतारी
दे ललकारी
नाव नसे भयलेशाचे

भारतमाता वीरांची
ही भूमी रणधीरांची
शैशवकाळीं
लिहिले भाळीं
भाग्य अम्हा रणवेषाचे

हृदयामधली हिंमत रे
स्वातंत्र्याची किंमत रे
गर्जा हरहर
रणभूमीवर
सांगा कूळ महेशाचे

पाक नव्हे, नापाक असे
अम्हा कुणाचा धाक नसे
सैतानांची
सेना त्यांची
साह्य अम्हा परमेशाचे

## ५४ : घाल शिपाई घाव

मुखि अल्लाचे नाव, अंतरीं सैतानाचा भाव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव

अत्याचारी हत्यार घेउन टपून हा बसला
अंधारातच लूट कराया घरामधे घुसला
शूर घरधनी सावध म्हणुनी बेत पुरा फसला
चोर किती शिरजोर, आणती वर सावाचा आव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव

आग ओकण्या जरी विमाने शंभर याची आली
अचूक बसता घाव जिव्हारीं कोसळतिल ती खाली
खुनी खंजिरा याच्या उत्तर खड्ग तुझे जयशाली
चूड हिसकुनी त्याच्या करिंची घरास त्याच्या लाव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव

राख राख आईची इज्जत, विचार येथे कसला
दूध पिउनि हा साप उलटला ठेच जिथे हा दिसला
तू धैर्याचा पुतळा केवळ शौर्याने रसरसला
जयजय भारतमाता, वीरा, घे देशाचे नाव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव

## जनजागरण



५५ जनशक्तीचा जयजयकार

५६ लोकसागराचे स्तोत्र

५७ गीत नवे गाइन मी

५८ सवाल

५९ भाइ सावध व्हा

## ५५ : जनशक्तीचा जयजयकार

जित्या जागत्या जनशक्तीचा जगतीं जयजयकार
जनतेसाठी जनतेहातीं जनतेचे सरकार

भर दिवसा रवि मावळला    अंधार भरे गगनात
मर्मावर पडता घाला    घायाळ वीर समरात
दुमदुमला वेताळांचा    उन्मत्त घोष जगतात
परि माती ही अभिमानी
रक्ताची जात इमानी
मर्दांची जिद्द तुफानी
राखेमधुनी उठले फिरुनी धगधगते अंगार

राष्ट्राच्या सामर्थ्याची    विश्वाला पटली ग्वाही
अन्यायी जुलुमापुढती    हा देश वाकला नाही
जनसामान्याला येथे    नामंजुर तानाशाही
पाशवी बळाच्या पुढती
लढवय्ये येथे लढती
सत्तांधा मिळते माती
प्राणपणाने प्रकाशयात्री झुंजति रणझुंजार

दुनियेतिल दिलदारांनो    द्या दाद मर्द देशाला
गगनातिल गंधर्वांनो    झंकारत या स्वरमाला
जय आत्मबलाचा झाला    जाहीर करा जगताला
हे सिंहासन जनतेचे
हे न्यायासन समतेचे
अधिराज्य इथे ममतेचे
जनशक्तीच्या चैतन्याचा घडला साक्षात्कार

## ५६ : लोकसागराचे स्तोत्र

हे असीम हे अथांग लोकसागरा
हे युगांतका प्रणाम घे युगंधरा

हे अजेय अपरिमेय हे अनामिका
अक्षरा निरक्षरा अगण्य-नायका
हे अबोल हे अमोल राष्ट्रतारका
सर्वशक्तिमंत सकल गर्वहारका
हे अजिंक्य हे अतर्क्य हे शुभंकरा
हे युगांतका प्रणाम घे युगंधरा

भास्करा कुणी भयाण ग्रहण लावले
त्यासवेंचि गगनगोल अस्त पावले
दश दिशांत गहन घोर तिमिर दाटला
अंध लोचनां कळे न कोण कोठला
उजळली अशा क्षणीं तुवां वसुंधरा
हे युगांतका प्रणाम घे युगंधरा

मूर्तिमंत रौरवात राज्य कौरवी
धुंदले तरी मदांध आत्मगौरवीं
कुणि विराटपुत्र करिति वल्गना फुका
कंचुकींस समररंग काय ठाउका
पांचजन्य फुंकलास पार्थजागरा
हे युगांतका प्रणाम घे युगंधरा

कोटिशीर्ष कोटिचरण कोटिभुजधरा
कोटिकंठ कोटिहृदय कोटिदिनकरा
सार्वभौम ईश असुन नमसि क्षुद्र तू
वरि नितांत शांत शांत आत रुद्र तू
हे अगम्य उग्र रम्य ग्राम्यनागरा
हे युगान्तका प्रणाम घे युगंधरा

## ५७ : गीत नवे गाइन मी

पंख जरी जळलेले नील नवे पाहिन मी
मृत्युंजय मुक्तीचे गीत नवे गाइन मी

काजळल्या आभाळीं गवसावा सूर कुठे
किरणांच्या स्पर्शाने पक्ष्याला कंठ फुटे
राखेतुन उंच उडुन गगनशिरीं जाइन मी

पंजरात फसलेले शुक मंजुळ बोलतात
पाहुन प्रियदर्शिनीस गजराजे डोलतात
गृहमयूर होण्याहुन व्याधबाण साहिन मी

मी म्हटले ईश्वरास जळताना ज्वालांवर
नाचणार नाही मी सबळांच्या तालावर
आक्रोशात एकाकी विजनातच राहिन मी

धडधडून प्रळयाग्नी आला जर घेत घास
निर्जनात पक्ष्यांची पडली जर प्रेतरास
शेवटला उंच सूर मुक्तीला वाहिन मी

## ५८ : सवाल

काय तुम्हाला राज्य पाहिजे भ्रष्टाचाऱ्यांचे ?
स्वार्थासाठी हपापलेल्या सत्ताधाऱ्यांचे ?

ज्यांचे आत्मे सरपटणारे, बरबटलेले हात
हांजी हांजी करण्यापुरते बळ ज्यांच्या देहांत
काय तुम्हाला राज्य हवे या असल्या चोरांचे ?

गरिबांचे घर लुटून ज्यांनी पेटविली होळी
होळीवरती भाजुन घेती स्वार्थाची पोळी
काय तुम्हाला राज्य हवे या पाळेगारांचे ?

वर्षे झाली तीस, बैसले खुर्चीवर गब्रू
देश लावला देशोधडिला घालवली अब्रू
काय तुम्हांला राज्य हवे या दावेदारांचे ?

हिंमत दावुन किंमत जोखा दिवाळखोरांची
सुस्तीमध्ये चुस्त राहता चंगळ चोरांची
राज्य असू दे श्रमणाऱ्यांचे जैनकैवाऱ्यांचे

तुम्हीच तुमचे भाग्यविधाते राष्ट्राचे आधार
तुम्हीच तुमच्या प्रगतीसाठी ठेवा दृढ निर्धार
जनतेपुढती चळचळ कापे दळ बळजोऱ्यांचे

# सेवा दल



६० इतिहासाचे मानकरी

६१ सेवादल नित भारतहितरत

६२ चला चला रे चला चला

६३ सैनिक आम्ही न्यारे

६४ भाऊ लहान बहिणी लहान

६५ या रे सारे येथ जमा

६६ एक निश्चय

६७ नवयुवका

६८ रुमुझुमु घुमुनी

६९ भारतभूमी तुला नमी मी

७० ब्रीद तूझे विस्मरुनीया

७१ कधि पाहिन मी ते दृश्य बरे

## ६० : इतिहासाचे मानकरी

सेवादल सेवादल सेवादल ध्यास जयां
हर्षाने उल्लेखिल भावी इतिहास तयां

देशाचे सैनिक ते, दलितांचे सेवक ते
तरुणांचे नायक ते, श्रमिकांचे पाइक ते
शौर्याची आस जयां, सेवेची प्यास जयां
मानाने उल्लेखिल भावी इतिहास तयां

नम्र जरी सैनिक हे, मान सदा उन्नत ही
सर्व समाजांतिल हे, एक परी मिळत ही
श्रमण्यातच विश्रांती, झिजणे उल्हास जया
उल्हासुनि उल्लेखिल भावी इतिहास तयां

'मीपण' जाऊन इथे, 'आपण' हा भाव उरे
सैनिक ह्या नात्यातच व्यक्तीचे नाव विरे
ध्येयाच्या स्वप्नांचा आहे हव्यास जयां
आनंदुनि उल्लेखिल भावी इतिहास तयां

भाटांनो दूर पळा, कीर्तीचे स्तोत्र नको
त्यागाने देश फुलो, हारतुरे मात्र नको
देशाचे दास परी देश नको दास जयां
गर्वाने उल्लेखिल भावी इतिहास तयां

कोणाचे दास्य नको, परक्यांचे धनिकांचे
सर्वांचे राज्य असो, देशातिल श्रमिकांचे
तोंवरि रुचणार नसे सोन्याचा घास जयां
सोन्याने उल्लेखिल भावी इतिहास तयां

## ६१ : सेवादल नित भारतहितरत

सेवादल नित भारतहितरत म्हणुनि धरू अभिमान
सेवादल नच जातिंस जाणत म्हणुनि करू वर मान

सेवादल पथ योग्यचि दावत संघटना करणार
धर्मावरि वा जातीवरि वा नाहि तया आधार
जो जो हिन्दी त्यास न बन्दी हे दलब्रीद महान
सेवादल नित भारतहितरत म्हणुनि धरू अभिमान

एक दिलाचे सैनिक अमुचे ध्येय तयांचे एक
शिस्तीचे ते भोक्ते मोठे आज्ञाधारक नेक
आज्ञा करिता राष्ट्राकरिता देतिल अपुली मान
सेवादल नित भारतहितरत म्हणुनि धरू अभिमान

जो दलसैनिक तो जनसेवक बंधुचि तो सर्वां
संकटसमयीं जीवाचीही नाहि तया पर्वा
ध्येयास्तव तो त्यागा स्तवितो करि कसलेही दान
सेवादल नित भारतहितरत म्हणुनि धरू अभिमान

## ६२ : चला चला रे चला चला

चला चला रे चला चला, पद उचला
दलामधे झणि जाउ चला, आजला

तिथे आपल्या ध्वजासमोरी
ऐक्यगान ते गाउ सत्वरी
एकरूप मग होउ अंतरीं
नव तेजाने नव ओजाने पुनीत आत्मा हो अपुला

ऐक्याची मधु गीते गाता
ऐक्याचा मधु मधुर सेवता
ध्येय आपुले येइल हाता
ध्येयमंदिरीं, चला खरोखरि, त्वरा करोनी चला चला

थोरांमधले विवाद विसरा
दलापासुनी दूर नच सरा
राष्ट्रधर्म तर नाही दुसरा
नव धर्माचे, पूजक साचे, हाच धर्म आम्हा रुचला

हिन्दू, मुस्लिम, शीख, पारशी
असल्या जाति न आम्हापाशी
हिंदी तितुका धरु हृदयाशी
"आपण हिंदी राहु न वंदी" करा निश्चया या अचला

एकदिलाचे वीर दलाचे
नव उत्साहें अंतर नाचे
एकमुखाने घोषायाचे
वाढवु दलबल, राहु न निर्बल, भारत ठेवू नच दुबळा

सेवा दल :

## ६३ : सैनिक आम्ही न्यारे

भारतवर्षा प्यारे        सैनिक आम्ही न्यारे
नसानसांतुन खेळत राही स्वातंत्र्याचे वारे

गांधीटोपी साधी
जिरटोप पोलादी
जाडीभरडी खादी अंगीं चिलखत पाहुनि घ्या रे

सारे धर्म नि जाती
येथे एकच होती
हिंदू, मुस्लिम, शीख, पारशी सकलां उघडी दारे

येता अमुची सेना
हाहा:कार दिसेना
दुर्बल जनता आम्हा पाहुनि म्हणते या रे या रे

नाहित नीच कनिष्ठ
किंवा श्रेष्ठ वरिष्ठ
अधिकारीही सैनिक सारे म्हणतो हे अधिकारें

## ६४ : भाऊ लहान बहिणी लहान

भाऊ लहान, बहिणी लहान, लहान लहान मुले
आम्ही लहान लहान मुले
सेवादलामध्ये जातो वीर सानुले, आम्ही वीर सानुले

" खेळता काय, शिकता काय, आहे तेथे काय ! "
" कळायाचे नाही स्वतः पाहिल्याशिवाय ! "....
चला सारे जाऊ तिथे....सहा वाजले, अरे, सहा वाजले

कोणी नाही करायाचा उशीर येण्या
शिटी होता जमायाचे " नमस्ते " देण्या
शांत आता राहू सारे, ध्वज हा डुले, देखा, ध्वज हा डुले

चला आता खेळू थोडे, खेळू हुतुतू
शिस्तीमध्ये खेळा, नका करू मी-तू-तू
राहिलेले लाठी घ्या रे, लेजिम घ्या कोणी
राहिलेले गाऊ या रे दलाची गाणी
स्वातंत्र्याची गाणी गाता, जीव हा फुले, गाता, जीव हा फुले

चला आता प्रार्थनेला रहा उभे नीट
एका सुरावरी म्हणा, ऐकताच शीट
नीट करा ' नमस्ते ' नि रहा उभे शांत
' गिनती ' मात्र सांगायाची मोठ्या आवाजात
चला आता घरोघरी जाऊ आपुले, घरी, जाऊ आपुले

सेवादलामध्ये येऊ खेळू हासू गाऊ
एक होऊ आणि म्हणू आम्ही भाऊ-भाऊ
आपसात भांडुनिया बुडती सारे
एक होता स्वातंत्र्याचे संचरे वारे
भारताच्या भविष्याचे दीप सानुले, आम्ही, दीप सानुले

## ६५ : या रे सारे येथ जमा

या रे सारे येथ जमा या झेंड्याखाली
बाल असा वा थोर असा या सायंकाळीं

हिन्दु असा मुस्लीम असा
येथे नाही भेद तसा
सेवादल तर सकलांचे बंधन ना घाली

नका माजवू व्यर्थ दुही
काल नका दवडू कलहीं
संघटनेचा मंत्र जपा तो अपुला वाली

भवतीचे जग उंच चढे
भारत परि पायीं चिरडे
करा प्रतिज्ञा, "भारतभू करु वैभवशाली"

"कलहप्रिय हा हिंदुस्थान"
जग करिते ऐसा अपमान
चला करू या संघटना या संकटकालीं

तनमन अर्पा या कार्या
संघटनाचि तपश्चर्या
उन्नत करु या भारतभू अवनत जी झाली

## ६६ : एक निश्चय

सेवादल हे मानू जीवित
सेवादल हे मानू दैवत
झटू तयाच्या वृद्धीस्तव नित
कोणी काहि म्हणोत

सेवादल पथ तारिल सकलां
बलशाली ते करील विकलां
तनमनधन हे अर्पू त्याला
निश्चल निश्चयज्योत

हिंदू मुस्लिम भाईभाई
एक आपुली भारतमाई
स्वातंत्र्याचे सर्व शिपाई
खात्री ओतप्रोत

राम म्हणा कुणि रहिम म्हणा वा
ईश्वर केवळ एक म्हणावा
ज्याचा त्याचा प्रश्न गणावा
शास्त्र कुणी परजोत

जोवर आहे प्राण तनूमधि
जोवर आहे त्राण जिवामधि
तोवर विझुनी जाइल ना कधि
राष्ट्रप्रीति-ज्योत

येवो संकटपर्वतराशी
शस्त्र रोखुनी धरा उराशी
राहिल निश्चय हा अविनाशी
कोणी काहि करोत

## ६७ : नवयुवका

नवयुवका येइ, पाहि
सेवादल तुजसि बाहि
   आवाहन करिते तव उच्च भावनांना

सेवादल-मंत्र ऐक
संघटना-तंत्र शीक
   शिकव तोच संघटना-मंत्र बांधवांना

या अग्नीतून प्रखर
ये स्फुलिंग घे सत्वर
   मंगलाग्नि मग नेई तूंच दश दिशांना

या पवित्र गंगेतिल
ओंजळीत घेई जल
   जा पुनीत कर दुसऱ्या देशबांधवांना

तरुणांवर सर्व भिस्त
बाणव अंगात शिस्त
   शिस्तीचे देइ पाठ सकळ या जनांना

पूर्वज-स्तुतिगान करुनि
परि आता मौन वरुनि
   होइल का लाभ काहि सांग वर्तमाना

विचलित नच होइ निमिष
जातियता समज कुविष
   राष्ट्राच्या आधारा, येइ सुखनिधाना

एक एक जमुनि विन्दु
होइल रे भव्य सिन्धु
   कापतील रिपु ऐकुनि रौद्रगर्जनांना

## ६८ : रुमुझुमु घुमुनी

रुमुझुमु घुमुनी लेजिम राही
टकमक सकलां जनता पाही
बालचमू ही चलाख अचपळ
वनात हरिणे जैशी काही

हिरव्या हिरव्या माळावरती
पाउल पडते तालावरती
रुमुझुमु घुमता लेजिम मंजुळ
हसू उमटते गालांवरती

आभाळातहि चंद्र तारका
लेजिम खेळति एकसारखा
चांदोबाला आळस भारी
वेळेवर तो हजर राहि का ?

तारा येती वेळेवरती
फेर धरोनी उभ्या राहती
परी खेळता येइ न त्यांते
कुणी न हलती कोणी पडती

पथक आमुचे ये वेळेवर
फेर कतारी करी बरोबर
रुमुझुमु घुमता लेजिम मंजुळ
क्षणाक्षणाला नाचे अंतर

## ६९ : भारतभूमी तुला नमी मी

भारतभूमी तुला नमी मी तुझा विनम्र कुमार
भारतमाते सदैव मातें असो तुझा आधार
एक तूची असशी साची मजला जीवाधार
भारतभूमी तुला नमी मी तुझा विनम्र कुमार

आई अंकावरती तूझ्या आजवरी बागडलो
कर्तव्याच्या पूर्तीसाठी नाही गे धडपडलो
अनुतापाने जळते आता अंतर हे शतवार
नयनांमधुनी झरझर झरते अश्रुजलाची धार

अश्रुफुलांची माला केवळ देइल कैशी शक्ती
शक्तीसाठी अमुच्या हृदयीं आहे भारतभक्ती
चाळिस कोटी बाळे होऊ कोटयवधी अंगार
जीवज्योती जळत्या ठेवू, नष्ट करू अंधार

पाउल पडता तालावरती हृदया हृदय जुळाले
या हृदयांच्या जुळणीमधुनी आम्हा धैर्य मिळाले-
एकदिलाचे वीर दलाचे जातिल कोणा हार
कोण आमुचा तुफान संगर यापुढती सहणार

## ७० : ब्रीद तूझे विस्मरुनीया

ब्रीद तूझे विस्मरुनीया सैनिका भागेल का ?
क्रान्ति येता पाउल मागे घेउनी चालेल का ?

ज्या ध्वजापुढती आदरें नमता
आणि नेमाने ज्यापुढे जमता
त्या ध्वजाला, प्राण जावो, संगरीं रक्षाल का ?

ऐक्य-समतेचे ध्येय घोकावे
बंधुभावाचे वेद घोषावे
क्रान्तिमध्ये या त्रयीस्तव देहही ठेवाल का ?

धैर्य-शौर्याचा घेत आनंद
खेळता लाठी होतसा धुंद
या बळाने दुर्बळांना रक्षिण्या धावाल का ?

ठाउके तुम्हा पूर्वसंघर्ष
ऐकता गोष्टी होतसे हर्ष
नायकांच्या घेउनीया भूमिका रंगाल का ?

होउनी गेले भारती वीर
ज्या हुतात्म्यांनी अर्पिले शीर
घेउनी जागा तयांच्या चेतुनी पेटाल का ?

वादळापूर्वी शांत हो सारे
अंति यायाचे वादळी वारे
मर्द हो होता इशारा धावुनीया याल का ?

## ७१ : कधि पाहिन मी ते दृश्य

कधि पाहिन मी ते दृश्य बरे
कधि स्वप्न मनातिल होय खरे

लाख लाख सेवादल सैनिक
भारतभूचे विनम्र पाइक
हिन्द्‌जनांचे विरक्त नायक
सागर त्यांचा पाहिन मी

एक असे मैदान केवढे
तिथे तिरंगा उंच फडफडे
तालबद्ध ते झडति चौघडे
दक्ष लक्षदल पाहिन मी

शुभ्र खमिस अन् विजार खाकी
खुले मस्तकीं टोपी तिरकी
जवान ऐसे ध्वजासंमुखी
असंख्य संख्या पाहिन मी

पाहुनिया ती भारतसेना
उणे कुणाला लव गवसेना
विरोधकांचे नाव दिसेना
आशापूर्ती पाहिन मी ?

ती संघटना नव तरुणांची
किरणावलि वा नव अरुणाची
फेड करिल जंव मातृ-ऋणाची
डोळे भरुनी पाहिन मी

# लोकनृत्याची गाणी



७२ शेतकरी राजा

७३ घाला हाळी

७४ भलरी

७५ चल सर्जा

७६ राइतल्या रावळात

७७ चल ग सोने

७८ चंद्र आलाया आभाळीं

७९ अन्नदाता

८० भाकरीचे गाणे

ग्रंथ संग्रहालय
२०७९
दा. क्र. २३०७६
दिनांक ११/८/८३
शाखा (स्थळ प्रत)

## ७२ : शेतकरी राजा

चल चल माझ्या रं शेतकरी राजा

राहु नको बसून, कंबर कसून, चल चल माझ्या रं शेतकरी राजा
एकसाथ उठून, काम करा झटून, चल चल माझ्या रं शेतकरी राजा
सावकारशाही, मालकशाही, ठेवायची नाही रं शेतकरी राजा

अन्याय जुलूम सोसल्यात लई
याच्या म्होरं काही सोसायचं नाही
सोसायची नाही आता भुकेची आग
शेतकरी राजा तू लवकर जाग
लवकर, लवकर, लवकर ! चल चल माझ्या रं शेतकरी राजा

गावचा कारभार गावाहाती
पिकत्याल मळ्यात माणिकमोती
माणिकमोत्यांची भाकर खाऊ
एकजूट करा हो गावकरी भाऊ
झटकन् झटकन् झटकन् ! चल चल माझ्या रं शेतकरी राजा

## ७३ : घाला हाळी

चल माझ्या रामा हरी
चला सारे गावकरी
सोनियाची येळ खरी — घाला हाळी
घाला हाळी अन् वाजवा टाळी अन् घाला हाळी

धरती म्हणते नेसू कंचा शालू
कंचा अंगावर शेला घालू
हिरवा शालू शेला सोनसळी — अन् वाजवा टाळी

आता नको कधी कर्ज काढाय्
सावकाराचं नको व्याज वाढाय्
फुलला मळा आपली बहार झाली — अन् वाजवा टाळी

मोट करित राहील कुंई कुंई कुंई
गोफण गाणं गाईल गुंई गुंई गुंई
राखण करित राहू हुई हुई हुई
सावध रहा समदे समद्या काळीं — अन् वाजवा टाळी

## ७४ : भळरी

भळऽऽरी भळऽऽरी भळरि दादा भळरी
भळगडी दादा भळरी

भळरि भळरि भळरि भळरि, भळरि घाल ग मैना
भळरि घालता येईना
भळरि भळरि भळरि भळरि, भळरि घाल ग गंगू
मला नको ग सांगू
भळरि भळरि भळरि भळरि, भळरि घाल ग जमना
भळरि घालाया जमं ना
भळरि भळरि भळरि भळरि, भळरि घाल ग साळू
भळरि घाळून खेळू

गिमाचा कार मग मिर्गाची धार
हत्तीच्या सोंडेतनं पान्याचा मार
वावर फुललं, जित्राप झुललं, काळीनं म्हनलं भळरी

हळद लावते तुरी कुवार
मोत्यानं नटते तरनी जवार
अस्विन थंडी, बांधा ग पेंडी, पीक सात खंडी भळरी

इरकल साडी हिरवा चुडा
साळूचा झाला साखरपुडा
खिलार जोडी, झोकात गाडी, धन्याची गोडी भळरी

## ७५: चल सर्जा

चल सर्जा, चल राजा, बिगि बिगि बिगि जायाचं
बिन मोलाचं बिन तोलाचं सौंगडी शेतकऱ्याचं

झुलवित झुलवित अंगावरची झूल चल सर्जा
शिंगावरच्या गोंड्याऐसा डोल चल राजा
पांदीमधुनी माळावरुनी चौखुर धावायाचं

माथ्यावरती ये दिवसाचा डोळा चल सर्जा
होय भुकेला शंभु माझा भोळा चल राजा
भाकर कांदा, झुणका रांधा, पोट भरे रायाचं

उडेल फेटा पळसाच्या रंगाचा चल सर्जा
खण जरतारी आणिन मी भिंगाचा चल राजा
तुजवर माळा, घुंगुरवाळा, लेणं सौभाग्याचं

येइल आतां चांदोबा आभाळीं चल सर्जा
वेडी होइल पारंब्यांची जाळी चल राजा
कलत्या माना, डुलक्या घ्या ना, टकमक नच पाह्याचं

## ७६ : राइतल्या रावळात

राइतल्या रावळात, देवीच्या देवळात, सनई अन् चौघडा
राइबाइ घ्या कमरेवर घडा
सइबाइ घ्या डोईवर घडा
सखुबाइ घुम्घुम् घुमवू घडा
घुम्घुम् घागर घुमवू घडिभर वाहुन कुंकूपुडा
    सखुबाइ घुम्घुम् घुमवू घडा

बसलाय् घट हो अस्विन हसलाय्
मोत्याचा डोंगर मळ्यात दिसलाय्
आभाळ उघडलंय् निशाण चढलंय् अंबाबाइच्या गडा

    दंडामधे वाकी
    चमकि घालुन नाकी
    पैठणी नेसून ठुमकत या की
रुमझुम पिंगा, येउ द्या रंगा, किणकिण वाजंल चुडा

    धरतरि मावली नवसाला पावली
    आभाळ धरतंय सुखाची सावली
घरधनि खुशिमधे, हसत्याल मिशिमधे, रंगंल तुमचा विडा

## ७७ : चल ग सोने

चल ग सोने, ज्वारी म्हने ज्वानीमधे आली
खुसूखुसू आलं हसू हळदीच्या गालीं
चल ग सोने गावला म्हने सोनियाचा हंडा
चल ग सोने राखणीला घेउन गोफण गुंडा

भिर्र भिर्र पाखरांना
घालवू या दूर राना
चल ग सोने, सुगी म्हने मोतियाची झाली
चल ग सोने, ज्वारी म्हने ज्वानीमधे आली

चल ग सोने, गडी म्हने खुशीमधे आले
पिवळ्याशार पिकामधे फेटा लाल हाले
हलगी करी धुडुम् धनक्
लेझिम म्हणे छुनुम् छनक्
चल ग सोने, लूट सोनें दसऱ्याची खुशाली
चल ग सोने ‘ स्वारी ’ तुझी घोड्यावरी आली

## ७८ : भरती आलीया दर्याला

चंदर आलाया आभाळीं भरती आलीया दर्याला
डोंगरलाटांचा धिंगाणा मस्ती आलीया वाऱ्याला

सुंदर बंदरपट्टी रं
कोजागिरीची सुट्टी रं
दोसदारांची गट्टी रं
गोमू येकली हट्टी रं
खेचा तिला किनाऱ्याला भरती आलीया दर्याला

ढोलकं गळ्यात घाला रं
घुंगरु बांधून चाला रं
खारा वारा ये ओला रं
माडांपरीस डोला रं
घुम् घुम् धरा रं फेराला भरती आलीया दर्याला

काय ही चंद्राची करणी रं
येडी झालीया धरणी रं
दर्या धरतीच्या चरणीं रं
नाचती म्हातारी-तरणी रं
गोमू दाविल का तोऱ्याला भरती आलीया दर्याला

चंदरराजाला आली झिंग
लाटेलाटेवर फुटलं भिंग
वाजवा ढोलकं वाजवा शिंग
रातभर नाचा बिंग बिंग बिंग
पाहू पहाटी सूर्याला भरती आलीया दर्याला

## ७९ : अन्नदाता ( गीतमाला )

हा वसंत रंग भरित जगतिं येतसे पहा
बहरल्या दिशा दहा

कोकिलाहि उपवनात
अमृत-मधुर गीत गात
मधु पितो फुलाफुलांत
फिरत फिरत भृंग हा

मंद मंद मंद वात
मधुर गंध ने जगात
रम्य दिवस चांदरात
वाटते सुखावहा

✠

लवलवते तरुवरती । पालवि ही नवथर ती
सण मंगल जन करती । नटलेली जणु धरती
फुलबागा मन हरती । आम्रवृक्ष मोहरती
रानिं गुरे राखित कुणि बासरीत सूऽऽर भरती

✠

वरि वरि वरि जरि शेतकरी आनंदी दिसतो
मनिं काहुर, किति हुरहुर, मोजितसे दिस तो

✠

ऐन गिमाची ऐन दुपार
आभाळातुनि कोसळती जणु धगधगते अंगार

माती काळी किसान काळा
आईहुन का पुत्र निराळा
मध्यान्हाचे ऊन असू दे, नांगर तो धरणार

कुणी तरी ही डोलत आली
भाकर डोई ही घरवाली
    चिंचेखाली कांदा-भाकर पक्वान्नांहुनि प्यार

जमीन अवघी रखरखलेली
तहानलेली वखवखलेली
करपुन करपुन भाजुन भाजुन बनली काळीशार

✠

सकाळी दुपारी एकाच आशेने
लावितो किसान आभाळीं लोचन
जगाला जीवन द्यावया नवीन
आभाळामधून होऊ दे सिंचन

✠

गरज गरज रे असाच मेघराज तू
सुजल सुफल करुनि टाक भूमि आज तू

✠

जय जगदीश्वर सकलाधार
येत मृगाची ही जलधार
मिर्‌मिर्‌ मिर्‌मिर्‌ मिर्‌मिर्‌ मिर्‌मिर्‌ आला वारा
झर्‌झर्‌ झर्‌झर्‌ झर्‌झर्‌ झर्‌झर्‌ पाउसधारा
सर्‌सर्‌ सर्‌सर्‌ सर्‌सर्‌ सर्‌सर्‌ आल्या गारा
    जय अम्बे, जय जय मल्हार

घनश्याम बघता गगनात
नीलकंठ नाचेल वनात
ब्रह्मा रंगतसे सृजनात
    प्रभुच्या आनंदा नच पार

घळ्घळ् घळ्घळ् घळ्घळ् घळ्घळ् होई वृष्टी
हळु हळु हळु हळु नटली सृष्टी
किसान कैसा राहिल कष्टी
आनंदाची हीच बहार

✠

इवली इवली रोपे झाली साळीची भरदार
सोनेरी शेल्यांतिल शोभति इवलाले सरदार
वारा येता डोलडोलती झोपेला आली
मऊ मऊ शय्येवर त्यांना ठेवा या काली

✠

गुडघा गुडघा चिखलात पाय रोविले हो पाय रोविले
एकेक भाताचे रोप लाविले हो रोप लाविले
अन्नब्रह्म पोसावया सजले हे शेतकरी
लावणीचे दीस येता शेत लाविले हो शेत लाविले
थंडी आणि पावसाळा शेतकरी भीत नाही
डोईवर शोभेसाठी इरले ठेविले हो इरले ठेविले

✠

फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुरभाषिणीम्
रिम्झिम् रिम्झिम्
रिम्झिम् रिम्झिम् रिम्झिम्
श्रावणाच्या राज्याची बाई वेगळी रीत
ऊनपावसांची सदा चाले शर्यत
शिंपडती पृथ्वीवर प्रभु अमृत
कशि चाले बरसात
जग नाचे हर्षात
रिम्झिम् रिम्झिम्
रिम्झिम रिम्झिम् रिम्झिम्

✠

दिसादिसाने क्रमाक्रमाने शेत वाढले जोसात
प्रभुकृपेची खैरात
अभिमानाने पहात डोले शेतकरी मग डौलात
प्रभुकृपेची खैरात

✣

मोतियाची कणसं आली आज आमच्या शेतामधे

'का हो आज एवढी खुषी
काय झालं सांगा मशी'
'मेहनतिची दौलत ग, आली आमच्या हातामधे'

'काय आणू सांग तुला ?'
'काही नको जात्रा मला'
'नथ तरी नाकीं ?' 'तेवढी हवी बाकी'
'दंडामधे वाकी ?' 'अं हं ऽऽ, अं हं ऽऽ'
'गोऱ्या गोऱ्या दंडामधे सोनियाच्या वाकी ?'
'तेवढ्या हव्या बाकी'
'सगळं काही पाहिजे असुन मुरका उगा घेता मधे'

'शिरप्याला टोपि आणिन, एक आता जरतारी'
'चिंगीला खण हवा, एक बाइ कोइमतुरी
कोल्हापुरी फेटा आणा तुमच्यासाठि वेतामधे'

'सर्जाची राजाची जोडी आतां जुपुनशानी
शहराला जाउ चला आपुन दोघं राजारानी'
'मीहि येते बाबा'
'आइ जरा थांबा'
'तुमच्याबिगर जाऊं कुठं, चल रं पोरा टेसामधे'
'तुमच्याबिगर जाउं कुठं, चल ग पोरी टेसामधे'

## ८० : भाकरीचे गाणे

गानं या रं गायाला । भाकर नाही खायाला
बोला मायबाप राजाला । भाकर पोटा द्यायाला
झाला दानागोटा म्हाग
पडतिया पोटामंदी आग
कोंडा द्या रं खायाला । भाकर पोटा द्यायाला

सरकार मायबाप दील का रं दिडका ?
नायबा नायबा नायबा नायबा
सरकार मायबाप दील का रं तुकडा ?
नायबा नायबा नायबा नायबा
या रं हिस्कुन घ्यायाला । भाकर पोटा द्यायाला

पाटीलबाबा पाटीलबाबा
आमी काय हो चिखुल खाबा
सांगा मामलतदाराला । भाकर पोटा द्यायाला

कशाचा पाटिल देतुया खाया
पुरं मर्दानुं पडनं पाया
मागं सारा बाह्यांला । भाकर पोटा द्यायाला

या पोरानूं या थोरानूं
या बाबांनूं या बायांनूं
चिरगुट मिळवा ल्यायाला । भाकर मिळवा खायाला

यारं यारं सारं यार
कंबर बांधुन व्हा तैयार
रगतामंदीं न्हायाला । पर भाकर मिळवा खायाला

# संकीर्ण



८१ माझ्या रामा हरी
८२ उठा शौर्यसागरा
८३ टिपरी पडली नौबत झडली
८४ एक मराठा देश
८५ सांग सागरा सांग जगाला
८६ स्थिर मेरूचे पूत विनोबा
८७ धर्मचक्र फिरले
८८ खबरदार
८९ आली कोकणगाडी
९० बाळ तरूची पालखी
९१ प्रार्थना

## ८१ : माझ्या रामा हरी

माझ्या रामा हरी, माझ्या रामा हरी,
माझ्या रामा हरी, माझ्या रामा

मिराबाइची मंजुळ भजने आणिति प्रभुला जाग
दारिं सावता माळी फुलवी सुंदर रे फुलबाग

अंगण झाडित अखंड गाई अभंग चोखामेळा
राधा गवळण गोदुग्धाचा भरूनि आणी पेला

देवासाठी जडवि भूषणे नरहरि सोनार
थाळी घडवी देवासाठी गोरा कुंभार

दरवाजामधि शिदनाकाची झळके तलवार
रोहिदास तो चर्म घेउनी ढाल मढविणार

कीर्तनरंगीं दंग जाहली तुकयाची वाणी
कान्होपात्रा वीणा घेउनि गात बसे गाणी

कबीर मोमिन वस्त्र विणी ते शिवून दे नामा
विमुक्त मुक्ताबाई घेई श्रीहरिच्या नामा

साळी, माळी, महार, गवळी, शिंपी, मोमीन
सारे झाले श्रेष्ठ प्रभूला नाहित कुणि हीन

## ८२ : उठा शौर्यसागरा

सूर्याने शिरपेच खोविला सह्याद्रीच्या शिरा
माय मराठी हाक मारिते उठा शौर्यसागरा

युगायुगांची रात्र संपली ऐका नभिं चौघडे
दुमदुमले शिवनेर राजगड सिंहगडाचे कडे
पहाटवारा घालुन गेला राखेवर फुंकर
रणवेदीवर तडकुन फुटले ठिणग्यांचे झुंबर
निळ्या नभाच्या कमलकळ्यांच्या उलगडल्या पाकळ्या
पराक्रमाला तुमच्या झाल्या दहा दिशा मोकळ्या
पूर्व दिशेला अपूर्व सुंदर रंग चढे अंबरा
माय मराठी हाक मारिते उठा शौर्यसागरा

६

भीमातीरीं फुरफुरणारी अटकर घोडी उभी
टकमक टकमक पहात होती अटकेवरच्या नभीं
कृष्णातिरची भालावरची तळपत उठली अशी
त्या तेजाने ठिक्कर पडली तख्ते बावनकशी
अंजन कांचन करवंदीच्या जाळ्या हलल्या जरा
तगमग झाली झोप न आली तिकडे दिल्लीश्वरा
शिवकिरणांच्या चरणस्पर्शे हसली हिरवी धरा
माय मराठी हाक मारिते उठा शौर्यसागरा

पहा उजळली प्रवरातीरीं ज्ञानाची भूमिका
भेद बुडवुनी वेद निर्मिती नामा–एका–तुका
ज्ञानभक्तिची ध्वजा फडकली मंदिर-शिखरावरी
इथे प्रकटली अभिमानाची समर्थ वागीश्वरी
बारा मावळ उठले हरहर महादेव गर्जुनी
ऊठ ऊठ रे वीर मराठ्या झापड–निद्रेतुनी
पुरुषार्थाचा शिवमंगल दिन आला चालुन घरा
माय मराठी हाक मारिते उठा शौर्यसागरा

उठा उठा शिवतीर्थावरल्या धारकऱ्यांनो उठा
समतेच्या शुभ दिंडीमधल्या वारकऱ्यांनो उठा
उठा उठा ज्यां असह्य होते लाचारीचे जिणे
गरुडपिलांनो उठा कराया गगनाला ठेंगणे
उठा तृणांनो धूलिकणांनो स्वर्गा जिंकावया
प्रसन्न झाल्या शिवशक्तीला सामोरे जाउ या
प्राणफुलांची पूजा बांधा महाराष्ट्रमंदिरा
माय मराठी हाक मारिते उठा शौर्यसागरा

## ८३ : नौबत

टिपरी पडली, नौबत झडली, दुमदुमले अस्मान
शूरवीर रणधीर निघाले, चढले उंच निशाण

दर्याच्या लाटा खळबळल्या
गोऱ्याच्या बेड्या खळखळल्या
निःशस्त्रांच्या दर्शनमात्रें डळमळले सैतान

गार गालिचा हिरवा इथला
मर्दांच्या रक्ताने भिजला
थिजला नाही परी तयांच्या रक्तातिल अभिमान

अमर जहाले अमीचंदजी
थोरातांची थोरचि बाजी
नित्यानंदहि करि रणगाजी आनंदें बलिदान

आण तुझे दल सालाझारा
निःशस्त्रांवर गोळ्या मारा
कृपा जयांच्या दृष्टित त्यांना काय करील कृपाण

जय गांधीजी, जय जय भारत
लाख कंठ येती ललकारत
दाहि दिशांतुन स्वातंत्र्याचे दुमदुमते जयगान

## ८४ : एक मराठा देश

एक दिलाने एक मुखाने दुमदुमवा संदेश
गोवा-कोकण-वऱ्हाड-दख्खन एक मराठा देश

एकच आहे शांतादुर्गा-तुळजा-मायभवानी
एकच ही कोकणी-पुणेरी-नागपुरी-अहिराणी
एक असे हा भीमाशंकर-महादेव-मंगेश
गोवा-कोकण-वऱ्हाड-दख्खन एक मराठा देश

मंगेशाला नवस बोलती देशावरल्या माता
गोमंताचे हृदय हालते नाव विठूचे गाता
म्हणा तुकोबा म्हणा सोयरा, एक हृदय दो वेष
गोवा-कोकण-वऱ्हाड-दख्खन एक मराठा देश

सई कराया वसई तेथे वीर लढे चिमणाजी
सत्तरीतले राणे लावति इथे जिवाची बाजी
धुळीस मिळवू राज्य फिरंगी, एकच हा आवेश
गोवा-कोकण-वऱ्हाड-दख्खन एक मराठा देश

गोमंताच्या रंगभूमिवर नांदे नाट्य मराठी
मंगेशीच्या लता बहरल्या कृष्णागोदाकाठीं
कवि कृष्णाची गाणी गाई दिनानाथ सावेश
गोवा-कोकण-वऱ्हाड-दख्खन एक मराठा देश

शेतमळ्यांची कुळागरांची एकच आहे आशा
हिंदु म्हणा वा म्हणा इसाई ही वरवरची भाषा
धमनीमधले रक्त एक हे, एक असे हृदयेश
गोवा-कोकण-वऱ्हाड-दख्खन एक मराठा देश

## ८५ : सांग सागरा सांग जगाला

सांग सागरा सांग जगाला सांग सांग गर्जून
महाराष्ट्रगोमंतकमीलन ही वज्राची खूण

गोमन्ताच्या संतजनांची मराठीच वाणी
गोमन्ताच्या कोकिळकंठीं मराठीच गाणी
भजनपूजनीं रंग गायनीं घुमे मराठी धून
महाराष्ट्रगोमंतकमीलन ही वज्राची खूण

गोमन्ताच्या घरट्यामधुनी उडती बुलबुल दूर
पुणेमुंबईनागपुरांतुन भरुन टाकती सूर
असे रेशमी धागे हृदया टाकतात गोवून
महाराष्ट्रगोमंतकमीलन ही वज्राची खूण

गोव्यातिल मातांचे गाणे ऐकत साधेभोळे
मुंबापुरिची श्रांत लेकरे निजेत मिटती डोळे
मायलेकरांचे हे 'गोंवें' कधी न जाय तुटून
महाराष्ट्रगोमंतकमीलन ही वज्राची खूण

माड डोलती आनंदाने लवलव पोफळ नाचे
ताटातुटिचा काळ संपला बोलति मंगलवाचे
भुजाभुजा आनंदें लवती येते उरीं दाटून
महाराष्ट्रगोमंतकमीलन ही वज्राची खूण

कोण म्हणे वेगळी संस्कृती म्हणे भिन्न इतिहास ?
कशी मराठी परकी कैशी भिन्न कोकणी भास ?
बेडी गळली, हृदये जुळली, शंका काय अजून ?
महाराष्ट्रगोमंतकमीलन ही वज्राची खूण

## ८६ : स्थिर मेरूचे पूत विनोबा

स्थिर मेरूचे पूत विनोबा नवपवनाचे दूत तुम्ही
संसाराचे सार झोकुनी अनासक्त अवधूत तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही
तुम्हि गवताचे पाते असुनी गगनदिव्यांहुनि दिव्य तुम्ही

पाताळापर्यंत अंत तुम्हि बवता होउनिया पाणी
अर्थ मागुती धावत येई अशी मुखातुन ये वाणी
तुम्हीच जळता, तुम्ही जाळता, तुम्हीच अग्नी, हव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

क्रन्दनातले इंधन तुम्हा दहा दिशांतुनि दिसताहे
नवनीताहुन मऊ असुनहि वज्र तुम्हा न शिवू साहे
क्षितिजान्ताचे यात्रिक असुनी क्षितीस गणता सेव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

तुम्हि पृथ्वीचे लाल बाल परि स्वर्गाशी तुमचे नाते
तुम्हि सर्वांहुनि न्यारे असुनी सर्वांशी तुमचे जमते
दासांचे अनुदास तुम्ही, परि राजांचे उपजीव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

सूर्यवीर्य शशिशांति, भ्रांती वाग्याची मिनली अंगीं
समिधेपरि वरि शुष्क असुनि तुम्हि अंतरंग नित रसरंगीं
नित्य नव्या यज्ञाचे दीक्षित, विस्मरला अपसव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

## ८७ : धर्मचक्र फिरले

धर्मचक्र फिरले, पडता एकाकी पाउले
एकाकी पाउलांमागुनी लक्षावधि चालले

खुलली दहा दिशांची दारे
फुलले नवतेजाने वारे
हसले आनंदाने तारे
तृणातृणातुन कणाकणातुन मंत्र नवे उमलले
पडता एकाकी पाउले

नभाचा कोण धनी एकला
साठविल कोण जगातिल जला
वायुचा मालक कोणी भला
'सबै भूमि गोपाऽलकीऽऽ' गर्जत जन चालले
पडता एकाकी पाउले

दलितांनीही दिले दान याजला
ओळखुनि काळाच्या पाउलां
धनिक हो दान कराया चला
भूमिदान हा धर्म युगाचा मर्म खरे यातले
पडता एकाकी पाउले

## ८८ : खबरदार

खबरदार, खबरदार,
जागा जनसागर हो खबरदार

घोषवीत निज विजया
सूर्यबिंब ये उदया
दश दिशा, नव उषा, गगनिं रंगल्या कशा
किरणबाण प्राण हरी
अंधकार मरण वरी
लहर लहर अरुणरंग मंगलध्वजा धरी....खबरदार

मुक्तिमंत्र हृदयिं उठे
अंध-रूढि-बंध तुटे
उसळते, उकळते, तरुण रुधिर पेटते
जनमनात आग जळे
दुराचार दूर पळे
प्रलयविलयिं हो युगान्त, नूतन प्रभात ये....खबरदार

## ८९ : आली कोकणगाडी

लाल बत्ती हिरवी झाली आली कोकणगाडी
आली कोकणगाडी दादा आली कोकणगाडी
ठाणे-मुंब्रा-कल्याणाची ओलांडून खाडी
आली कोकणगाडी दादा आली कोकणगाडी

जंक्शन आता मागे गेले
पनवेलीचे ठेसन आले
ओढ लावी कर्नाळ्याची हिरवी हिरवी झाडी

आपृव्यापासुन गाठिल रोहे
तयार ठेवा नारळपोहे
स्वाऽगताला कोकणवासी सजले खेडोपाडीं

कश्शासाठी पोटासाठी
कोकणपट्टी-घाटासाठी
आगिनगाडी नागिण जैशी जाते नाऽगमोडी

दर्यावरचा खाइल वारा
पिऊन घेइल पाउसधारा
बघता बघता मागे टाकिल सावंताची वाडी

येथे डोंगर तेथे सागर
नारळ पोफळ हिरवे आगर
कणखर काळ्या देहाची ही थडथडणारी नाडी

सरता कोकण पुढती जाते
गोव्यासंगे जुळवी नाते
कर्नाटक अन् केरळ तामिळ प्रेमें यांना जोडी

कोकणवासी जनतेला ही
भवितव्याची देते ग्वाही
सुखी होउ दे गावित कोळी कष्टाळू कुळवाडी

शिंग तुतारी झडला ताशा
फळास आल्या अपुल्या आशा
कोकणच्या कैवारी नाथा ! आशीर्वादा धाडी

## ९० : बाल तरूची पालखी [ गीत सप्तक† ]

[ १ ]

धन्य धूलिकण पुण्य करी हे कोमल करुणावंता
नभात हिरवी विजयपताका लहरू दे बलवंता

या मातीच्या मुक्या मनातुन उसळो हिरवे गाणे
माधुर्याने फुले भरावी चैतन्याने पाने
हे तरुतरुणा मधुमंता
हे कोमल करुणावंता
नभात हिरवी विजयपताका लहरू दे बलवंता

आंथर सुंदर तव छायांबर अगा पथिकमैतरा
वाऱ्यासंगे पिंगा घालत रंगव नीलांबरा
हे श्याम वनश्रीकांता
हे कोमल करुणावंता
नभात हिरवी विजयपताका लहरू दे बलवंता

स्वरमंथर नव उषा अवतरो तुझिया शाखांवरी
मौनमोहिनी संध्या उतरो सबाह्य अभ्यंतरीं
रचि घरकुल निद्रित गीतां
हे कोमल करुणावंता
नभात हिरवी विजयपताका लहरू दे बलवंता

---

† क्र० १–२ : गीते. मूळ : गुरुदेव रवींद्रनाथ. क्र० ३ : दोहा.
क्र० ४ : छंद. क्र० ५ : श्लोक. क्र० ६ : मंत्र. क्र० ७ : आरती.

[२]

आज ये अंगणा पाहुणा गोजिरा
ये घरा आमुच्या सोयरा साजिरा

वाजवा नौबती
ये सखा सोबती
खेळवा संगतीं हा जरा लाजरा

कोवळे देहुडे
सावळे रूपडे
पोपटी अंगडे शोभते सुंदरा

हा वसन्तासवें
सृष्टिला हासवे
पालवे बोलवे सानुल्या पाखरां

श्रावणीं न्हातसे
आश्विनीं गातसे
साउली देतसे भूमिच्या लेकरां

बासरी ऐकतो
चांदणे झोकतो
नाचतो डोलतो झोंबतो अंबरा

अंगरेखांतुनी
पर्णशाखांतुनी
वाहतो जीवनीं अमृताचा झरा

दोस्त हो मस्तकीं
नाचवा पालखी
विश्व व्हाया सुखी या नव्या जागरा

सूर्य देवो द्युती
चंद्र देवो द्रुती
छत्रछायाकृती मित्र आला घरा

[ ३ ]

तुझ्या कुशीचे धन धरणी पुन्हा कुशीतच धरी
वीरसख्याची दीक्षा दे त्याला शुभ अवसरी
वज्रकवच दे तरुतनुला फूल पान मृदु करी
देइ निमंत्रण विहगकुला उदार तुझिया घरी

[ ४ ]

वाजव वाजव मेघराज आज वाजव इंद्राची भेरी
घुमव घुमव मंत्र गंभीर जांभळ्या नभोमंदिरीं
जागव जागव बालतरूला या सानंद स्पंदन उरीं
तुझ्या आगमनें आनंदघटिका सार्थकी लागू दे खरी
सजव सजव सौभाग्य-सोहळा वनाचा भुवनभरी
आतुर उत्सुक तरणी धरणी, अमृत-वर्षाव करी

[ ५ ]

पहिला शब्द सृष्टीचा तेजा ही पदवी तुला
या बालतरुच्या माथां ठेव दृष्टि सुमंगला

असे सामर्थ्य खेळावे गूढ त्याच्या जिवामधे
सार्थकी जन्म लागाया गर्द मोहर येउ दे

स्निग्ध पल्लवदेठांना दे तुझे तेज तेजसा
शतवर्ष तुझा होवो विजयध्वनि राजसा

[ ६ ]

पवमाना । ऐक ना । ही तुजला । प्रार्थना ॥
आषाढाच्या । प्रथम दिवशी । गाजते । घनगर्जना ॥
वाजते । तव बासरी । त्या क्षणा । हे पावना ॥
धरिती । मौन जेव्हा । तप्त राने । वेळू बने । हे प्रभंजना ॥
मोडिसी । श्वासमात्रे । तूच ती । मौनसाधना ॥

हे भुवनमंडलसंचरणा
हे अविरतगतिसंचलना

पवना । सकल प्राणा । पुरव ही । शुभ कामना ॥
बालतरुसमवेत मांडी । लीलया तू क्रीडना ॥
देइ त्यां । शुभदान । सुस्वर । गायना ॥
तू तुझ्या । लीलेसवे । करि लालना ॥
शिकव या । मृदु पल्लवां । निज नर्तना ॥

[ ७ ]

जय नीला नीरजा निर्मला नभा
अनन्ताची तूच अमृतप्रभा ॥

आकाशा तुझी रे प्रफुल्ल दृष्टी । उदार दृष्टी
मृद्गर्भामधून उभवी सृष्टी । रूपांची सृष्टी ॥

तुझिया आशीर्वादे वाढो ही मूर्ती । सावळी मूर्ती
दिव्य प्रकाशाने होऊ दे पूर्ती । जन्माची पूर्ती ॥

देई नभा याला निर्भर धैर्य । अचल स्थैर्य
सुवर्णपर्णांना देई सौंदर्य । हिरवे सौंदर्य ॥

तरुतरुणा करुणेने कराया धन्य । कोण रे अन्य
वनदेवतांनी द्यावे चैतन्य । मायेचे स्तन्य ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७६९
दा. क्र. २३०९६
दि. ११।९।८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023916

## ९१ : प्रार्थना

देह मंदिर चित्त मंदिर एक तेथे प्रार्थना
सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना

दुःखितांचे दुःख जावो ही मनाची कामना
वेदना जाणावयाला जागवू संवेदना
दुर्बळांच्या रक्षणाला पौरुषाची साधना
सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना

जीवनीं नव तेज राहो अंतरंगीं भावना
सुंदराचा वेध लागो मानवाच्या जीवना
शौर्य लाभो धैर्य लाभो सत्यता संशोधना
सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना

भेद सारे मावळू द्या वैर साऱ्या वासना
मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना
मुक्त आम्ही फक्त मानू बंधुतेच्या बंधना
सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना